दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष

निर्भीड पत्रकारीतेची

सोमवार, दि. ०६ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

# ‘महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६’राष्ट्रीय परिषदेचे उद्‍घाटन

## वर्तमान व भविष्यातील आव्हानांचा विचार करुन शैक्षणिक पद्धतीला नवी दिशा आवश्यक – मुख्यमंत्री

**नागपूर (दै. संध्या)**



वैश्विक ज्ञानाचे भारतीयीकरण व भारतीय ज्ञानाचे वैश्विकरण करणे, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य आहे. केवळ ऐतिहासिक बाबींचा गौरवपूर्ण उल्लेख करुन आपण महान होणार नाही, तर यासह वर्तमान आणि भविष्याची वैश्विक आव्हाने लक्षात घेऊन त्यानुसार शैक्षणिक पद्धतीला दिशा द्यावी लागेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ, विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्था, आयआयएम नागपूर आणि शिक्षा संस्कृती उत्थान न्यास, नवी दिल्ली या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने व्हीएनआयटी येथे ‘महाराष्ट्र ज्ञान सभा-२०२६ : विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण’या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्राचे विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. याप्रसंगी शिक्षा संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सचिव अतुल कोठारी, राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, आयआयएम नागपूरचे संचालक भीमराया मेत्री, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. मनाली क्षीरसागर, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु प्रशांत बोकारे, व्हीएनआयटीच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष मदाभूशी मदन गोपाल, संचालक डॉ. प्रेमलाल पटेल, लघु उद्योग भारतीचे रवनीत खुराना या मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, आज जग अत्यंत वेगाने पुढे जात आहे. पहिली औद्योगिक क्रांती 1760 मध्ये आली होती. त्यानंतरच्या आलेल्या तीन औद्योगिक क्रांतींचा काळ हा सुमारे अडीचशे वर्षांचा आहे. मात्र, मागील पंधरा वर्षांतच तीन औद्योगिक क्रांतींचा अनुभव जगाने घेतला आहे. बदलांची गती लक्षात घेतली नाही, तर आम्ही मागे राहू शकतो. या क्रांतीला गती देणारे ‘एआय’आणि ‘डीप टेक्नॉलॉजी’च्या विकासात भारतीयांचे अत्यंत मोलाचे योगदान राहिले आहे. आम्हाला शैक्षणिक धोरणातून असे मानव संसाधन घडवायचे आहे, ज्यात व्यक्तीमध्ये सर्वंकष विकासासह नैतिक व व्यावसायिक गुणांचे रोपणही अपेक्षित आहे. भौतिक, नैतिक, शारीरिक क्षमतेसह व्यावसायिक म्हणून ती व्यक्ती देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देणारीही ठरावी, अशी अपेक्षा आहे. जागतिक ज्ञान आणि भारतीय ज्ञान व्यवस्थेचा मेळ साधणारी आणि जागतिक आव्हानांचा सामना करणारी शिक्षण पद्धती आम्हाला विकसित करायची आहे, याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले.

मुख्यमंत्री म्हणाले, साठ टक्के नोकऱ्यांचे स्वरुप येत्या एक हजार दिवसांमध्येच बदलणार आहे. डीप टेक व एआय तंत्रज्ञान सर्व क्षेत्रांमध्ये आमूलाग्र बदल घडवत आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल, असा याचा अर्थ नाही. देशात संगणक क्रांती आली, त्यावेळीही अशीच चर्चा सुरु झाली होती. मात्र, आम्ही त्या क्षेत्रातही आमचा ठसा उमटविला होता. तंत्रज्ञान कधीच थांबत नाही. अशावेळी तंत्रज्ञानासोबत आपणही पुढे जाण्याची गरज आहे. विद्यापीठे तसेच शिक्षकांनी आजच्या काळात कुठले विषय सुसंगत व अनुरूप आहेत, याचाही विचार करण्याची गरज आहे. पंधरा वर्षात तीन औद्योगिक क्रांती येणार असतील, तर समाजात काहीही स्थायी राहू शकत नाही. प्रत्येकाला नव्या पद्धती स्विकाराव्या लागतील व शैक्षणिक क्षेत्र त्यासाठी अनुकूल करून घ्यावे लागेल आणि ज्ञानाचा प्रवाह पुढे न्यावा लागेल, असे आवाहनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.

# बारामतीमध्ये काँग्रेसचे अस्तित्व कधी नव्हतेच : अशोक चव्हाण

**बारामती (दै. संध्या)**



बारामतीची पोटनिवडणूक जर बिनविरोध झाली तर एक वेगळा मेसेज जाईल. ही प्रथा आणि संस्कृती सर्वांनी जपली तर हा वेगळा चर्चेचा विषय होणार नाही. काँग्रेसची काय अवस्था आहे हे जनतेला माहिती आहे, स्पष्टच बोलायचे झाले तर बारामतीमध्ये काँग्रेसचे अस्तित्व कधीच नव्हते. त्यांनी निवडणूक लढवली तरी नाममात्र लढवल्यासारखे होईल, त्याचा काही उपयोग होणार नाही, असे भाजप नेते अशोक चव्हाण यांनी म्हटले आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला टार्गेट केले जात आहे असे जय पवार यांनी म्हटले आहे, या प्रश्नावर बोलताना अशोक चव्हाण म्हणाले की, राजकारणामध्ये एकमेकांना टार्गेट करणे सुरूच असते त्यामध्ये काही नवीन नाही, असे त्यांनी जय पवारांनी राष्ट्रवादीला टार्गेट केले जाते असे म्हटल्याच्या प्रश्नावर बोलताना म्हटले आहे. या निवडणुकीत टार्गेट होण्याचा विषय येण्याचे काही कारण नाही. अजित पवार विमान अपघात प्रकरणी VAR च्या मालकाला अटक व्हावी असे जय पवार यांनी म्हटले आहे त्यावर बोलताना अशोक चव्हाण म्हणाले की, पहिले या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे. चौकशीचा अहवाल पुढे आला पाहिजे. एकदम निष्कर्षाला येऊ नये.अहवाल आल्यानंतर कारवाई करण्यात यावी. देशामध्ये अनेक कंपन्या चार्टर्ड विमान सेवा देत आहेत, काळजी घेणं गरजेचे आहे, घाईने कारवाई करणे योग्य नाही. अशोक चव्हाण म्हणाले की, बारामती निवडणुकीवर सपकाळ यांनी केलेल्या वक्तव्यावर वेगवेगळ्या नेत्यांचे वेगवेगळे वक्तव्य येत आहे. निवडणूक लढवायची का नाही, सपकाळ काय बोलतात, निर्णय घेतात हा त्यांच्या पक्षाचा अंतर्गत विषय.

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE


www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




# मोदींनी भारताचे सार्वभौमत्व परकीय शक्तींना विकले : प्रकाश आंबेडकर

**मुंबई (दै. संध्या)**



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भारताचे सार्वभौमत्व परकीय शक्तींना विकले आहे, अशी टीका वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे. प्रकाश आंबेडकर यांनी ट्विट करत सध्या सुरू असलेल्या भारताच्या परराष्ट्रीय धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, 8 जानेवारी 2025 रोजीच्या माझ्या निवेदनात, अमेरिकेतून 'तेजस' विमानांच्या इंजिनांच्या आयातीस झालेल्या दोन वर्षांच्या विलंबामुळे, या स्वदेशी विमानाचे उत्पादन वेळेवर होण्यास होत असलेल्या विलंबाकडे मी लक्ष वेधले होते. मी यावर जोर दिला होता की, हा आयातीतील विलंब अमेरिकेने हेतु पुरस्पर घडवून आणला आहे.

प्रकाश आंबेडकर म्हणाले, काही दिवसांपूर्वी हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडने (एचएएल) तेजससाठी इंजिन वितरणास विलंब केल्याबद्दल जीई एरोस्पेसवर दंड आकारला. एचएएलने एकूण 99 इंजिनची मागणी केली होती, परंतु आतापर्यंत त्या 99 पैकी केवळ 6 इंजिन वितरित करण्यात आले आहेत.

20 फेब्रुवारी, 2026 रोजीच्या माझ्या दुसऱ्या निवेदनात, मी यावर प्रकाश टाकला होता की, राफेलसाठी तयार होणाऱ्या आणि भारतात निर्यात केल्या जाणाऱ्या भागांच्या भविष्यातील खरेदीमध्ये अमेरिकन सरकारने 'पडद्याआड' कसा प्रभाव मिळवला आहे. राफेल करारापूर्वी, अमेरिकेतील लोअर ग्रुपने फ्रान्सच्या एलएमबी एरोस्पेसचे अधिग्रहण केले होते, जी राफेलच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि रडारसाठी महत्त्वपूर्ण कूलिंग फॅन आणि मोटर्स बनवते. पूर्वी, एक फ्रेंच कंपनी असल्याने, तिच्या निर्यातीसाठी अमेरिकेच्या मंजुरीची आवश्यकता नव्हती. आता, अमेरिकेच्या मालकीखाली आल्यामुळे, हे भाग अमेरिकेच्या निर्यात नियंत्रणाखाली येऊ शकतात, ज्यामुळे अमेरिकेला राफेलच्या सुटे भागांवर आणि दुरुस्तीवर संभाव्य प्रभाव टाकण्याची संधी मिळेल, अशी चिंता प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली.

# सुनेत्रा पवारांचा हर्षवर्धन सपकाळ यांना फोन

## बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा पाठिंबा मागितला; आज भरणार उमेदवारी

**मुंबई (दै. संध्या)**



सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या दोन्ही नेत्यांत नेमकी कोणती चर्चा झाली हे अद्याप समोर आलेले नाही. पण त्यांच्यात बारामती पोटनिवडणूक बिनविरोध करण्यावर चर्चा झाली असावी असा अंदाज बांधला जात आहे. दरम्यान, काँग्रेसने यापूर्वीच बारामतीची पोटनिवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. पण आता सुनेत्रा पवारांनी स्वतः सपकाळ यांना फोन केल्यामुळे काँग्रेस कोणती भूमिका घेते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे गत 28 जानेवारी रोजी एका विमान अपघातात निधन झाले होते. त्यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या बारामती विधानसभेसाठी येत्या 23 एप्रिल रोजी पोटनिवडणूक होणार आहे. बारामती हा अजित पवारांचा बालेकिल्ला आहे. त्यामुळे स्वतः सुनेत्रा पवार या मतदारसंघातून मैदानात उतरल्या आहेत. महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने सुनेत्रा पवार यांना पाठिंबा दर्शवला आहे. हे दोन्ही पक्ष अजित पवारांना आदरांजली म्हणून या निवडणुकीत आपला उमेदवार देणार नाहीत.

पण काँग्रेसने मात्र या निवडणुकीत उमेदवार देण्याची घोषणा केली आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी रविवारी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याशी फोनवरून संवाद साधला आहे. सुनेत्रा पवार व हर्षवर्धन सपकाळ यांच्यात नेमकी काय चर्चा झाली? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण सूत्रांनी या दोन्ही नेत्यांत बारामती विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध करण्याच्या मुद्यावर चर्चा झाल्याचा दावा केला आहे. परिणामी, काँग्रेस बारामती पोटनिवडणुकीत उमेदवार देण्याच्या आपल्या भूमिकेवर पुन्हा एकदा फेरविचार करण्याची शक्यता वाढली आहे. सुनेत्रा पवार यांनी राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांच्याशीही फोनवरून चर्चा केल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्याच्या राजकीय पटलावर पडद्यामागे मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. उल्लेखनीय बाब म्हणजे सुनेत्रा पवार यांनी शनिवारीच शिवसेनेच्या ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना फोन करून त्यांचा पाठिंबा मागितला होता. त्याला ठाकरेंनीही सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे आता काँग्रेसच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याविरोधात उमेदवारांची एक मोठी फळी उभी राहिल्याचे चित्र दिसत आहे. यात हिंदुस्तान जनता पार्टीचे सतिश कदम, न्यू राष्ट्रीय समाज पार्टीचे राघू घटुकडे, राष्ट्रीय किसान बहूजन पार्टीचे अरूण निटुरे यांच्यासह सागर भिसे, गजानन गवळी, त्रिशाला कांबळे, दिलीप अळोणी, दत्तात्रेय बेदरे, मिथून आटोळे, रजाक मुलाणी, संदीप खरात, विलास होळकर, अभिजीत बिचुकले, अनिल तुपे, संकेत गावडे, दादा थोरात आणि अभिजीत कांबळे असे अनेक अपक्ष उमेदवारही रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे बारामतीतील ही लढत बहुरंगी होणार असून मतदारांसमोर अनेक पर्याय उभे राहिल्याने निवडणूक अधिक चुरशीची होण्याची चिन्हे दिसत आहेत.

**ब्रेकिंग न्यूज**

# एकनाथ शिंदेंचे नेतृत्व कमकुवत होणार नाही



मुंबई (दै. संध्या) : अंजली दमानिया यांच्याकडे जर अशोक खरात प्रकरणी सीडीआर पोहोचला असता तर त्यांची पूर्ण कॉपी आली असती. एका हॉटेलच्या लेटर हेडवर काही गोष्टी इंग्रजीमध्ये लिहिलेल्या आहेत. त्यांनी सुद्धा काल स्पष्ट केले की अज्ञात व्यक्तीने हे दिले आहे. अशा आरोपाने काही एकनाथ शिंदेंचे नेतृत्व कमकूवत होणार नाही. उलट जनतेला एकनाथ शिंदेंना जे भावतात ते जनतेमध्ये वाढत जाणार आहे. त्या प्रकरणी सखोल चौकशी झाली पाहिजे अशी आमची मागणी आहे, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे. उदय सामंत म्हणाले की, अजित पवार यांच्या निधनानंतर बारामतीसाठी पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी हीच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भूमिका आहे. काँग्रेस कसे पुढे जाते आणि कसे मागे पडते यावर संजय राऊतांनी वक्तव्य केले आहे, त्यावर मी जास्त काही बोलणार नाही. साताऱ्यामध्ये जिल्हा परिषद निवडणुकीवेळी काय झाले यावर कार्यकर्त्यांशी चर्चा केली, प्रत्येक गोष्ट माध्यमांसमोर सांगायची नसते.येणाऱ्या निवडणुकीत जनतेची भावना काय हे समजेल.

**दै. संध्या अँकर** बारामती पोटनिवडणूक : अजितदादांना श्रद्धांजली म्हणून निर्णय

# शरद पवार गट निवडणूक लढवणार नाही

**मुंबई (दै. संध्या)**



बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याच्या राजकारणातून मोठी बातमी समोर येत आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या आज आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार असतानाच, शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस ही निवडणूक लढवणार नाही असा निर्णय घेण्यात आला आहे. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली म्हणून आम्ही बारामतीची पोटनिवडणूक लढवणार नाही, अशी अधिकृत घोषणा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी केली आहे. शरद पवार आणि शशिकांत शिंदे यांच्यात आज झालेल्या बैठकीनंतर ही भूमिका स्पष्ट करण्यात आली. यावेळी पत्रकारांशी बोलताना शिंदे म्हणाले की, अजितदादांचे निधन झाले तेव्हाच ही निवडणूक न लढवण्याचा विचार पक्षाने केला होता. ही निवडणूक बिनविरोध व्हावी अशी अपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केली होती, त्याला प्रतिसाद देत शरद पवार गटाने हा भावनात्मक निर्णय घेतला आहे. दरम्यान, काँग्रेसने या मतदारसंघात उमेदवार देण्याची शक्यता वर्तवली असून, त्याबाबत आमची त्यांच्याशी चर्चा सुरू असल्याचेही शिंदे यांनी नमूद केले. बारामतीप्रमाणेच राहुरी पोटनिवडणुकीबाबतही आजच्या बैठकीत खल झाला. राहुरी संदर्भात प्राजक्त तनपुरे यांच्याशी चर्चा झाली असून, आज शरद पवार आणि जयंत पाटील यांच्या अंतिम निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. राहुरीच्या जागेबाबत महाविकास आघाडीतील घटक पक्षांशी चर्चा सुरू असून लवकरच त्याबाबतची भूमिका जाहीर केली जाईल, असेही शिंदे यांनी स्पष्ट केले. शशिकांत शिंदे यांनी सत्ताधारी भारतीय जनता पक्षावर गंभीर आरोप करत खळबळ उडवून दिली. साताऱ्यात भाजपकडून सुरू असलेल्या राजकीय हालचालींवर टीका करताना ते म्हणाले की, आमच्या लोकांना फोडण्यासाठी 10 कोटी रुपये आणि सभापतीपदाचे आमिष दाखवले जात आहे. कर्णे आणि त्यांच्या पत्नीला अशा प्रकारची ऑफर देण्यात आली. तसेच, खरात प्रकरणातील सीडीआर (CDR) कोणी आणि का काढले, याचा खुलासा होण्याची गरज असल्याचे सांगत त्यांनी गृहविभागाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

दरम्यान, जय पवार यांनी काल केलेल्या विधानावर भाष्य करण्यास शशिकांत शिंदे यांनी नकार दिला. बारामतीतून शरद पवार गटाने माघार घेतल्यामुळे आता ही निवडणूक खरोखरच बिनविरोध होणार की काँग्रेस आपला उमेदवार मैदानात उतरवून रंगत वाढवणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# जैन समाज हिंदूच, अल्पसंख्याक दर्जा फेकून देण्याची वेळ

**मुंबई (दै. संध्या)**



■ धार्मिक ध्रुवीकरणाच्या राजकारणावर लोढांची तोफ; 'फूट डालो' धोरणावर प्रहार

राज्यातील सत्ताधारी बाकावरून पुन्हा एकदा 'हिंदू अस्मिते'चा हुंकार घुमला असून, यावेळी कॅबिनेट मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जैन समाजाच्या अल्पसंख्याक दर्जावरच थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. "जैन धर्म हा मूळ हिंदू संस्कृतीचाच अविभाज्य भाग आहे. मुघल, इंग्रज आणि त्यानंतर काँग्रेसने आपल्या 'फूट डालो आणि राज करो' या कुटिल नीतीने हिंदू समाजाचे तुकडे केले. आता ही गुलामगिरीची मानसिकता आणि अल्पसंख्याक दर्जा झुगारून मूळ प्रवाहात येण्याची वेळ आली आहे," अशा जळजळीत शब्दांत लोढा यांनी प्रशासकीय आणि राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. दक्षिण भारताचे उदाहरण देत लोढा यांनी धक्कादायक वास्तव समोर ठेवले. एकेकाळी दक्षिण भारतात २२ ते २३ टक्क्यांच्या आसपास असणारा जैन समाज आज केवळ ३ टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. ही केवळ आकडेवारी नसून एका मोठ्या राजकीय षड्यंत्राचा हा परिणाम असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. मुस्लीम समाजात अनेक जाती असूनही काँग्रेसने त्यांना संघटित ठेवले, मात्र हिंदू समाजाला जाती-धर्माच्या कप्प्यात बंदिस्त करून कमकुवत केल्याचा आरोप त्यांनी केला. हा केवळ वैयक्तिक विचार नसून यावर समाजातील ज्येष्ठ मुनी आणि विचारवंतांशी चर्चा सुरू असल्याचे लोढा यांनी स्पष्ट केले. जर समाजात व्यापक सहमती निर्माण झाली, तर जैन समाजाला अल्पसंख्याक दर्जातून बाहेर काढण्यासाठी आवश्यक ती कायदेशीर प्रक्रिया राबवण्याचे सूतोवाचही त्यांनी दिले आहे. राम जन्मभूमी आंदोलनाप्रमाणेच आता पुन्हा एकदा 'आम्ही हिंदू' ही भावना प्रबळ करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

पत्रकारांशी संवाद साधताना लोढा यांचा सूर केवळ धार्मिक नव्हता, तर तो प्रस्थापित व्यवस्थेला जाब विचारणारा होता. "ज्या जैन समाजाने जगाला अहिंसा आणि मानवतेचा संदेश दिला, त्यांना हिंदू धर्मापासून वेगळे करणे हा सांस्कृतिक द्रोह आहे," असे सांगत त्यांनी डॉ. हेडगेवार यांच्या विचारांची प्रासंगिकता अधोरेखित केली.

## संपादकीय

# ‘ओंजळभर पाण्या’चे शतक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी २० मार्च १९२७ रोजी दलितांना पाण्याचा हक्क मिळवून देण्यासाठी केलेल्या या सत्याग्रहाला सामाजिक समतेच्या लढ्याचा पाया मानले जाते. राज्य सरकारतर्फे विकास आराखड्यांच्या घोषणांमुळे या ऐतिहासिक स्थळाला नव्याने उजाळा मिळत आहे.

कोकण विभागातील रायगड जिल्ह्यातील महाडमधील ऐतिहासिक अशा चवदार तळ्याचा सत्याग्रह २० मार्च १९२७ रोजी थोर प्रज्ञावंत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांना पाण्याचा हक्क मिळण्यासाठी केला. या ऐतिहासिक घटनेच्या शतक महोत्सवाला शुक्रवारपासून सुरुवात झाली आहे. या ऐतिहासिक दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन शुक्रवारी सकाळी ८.३० वाजता रायगड पोलीस दलातर्फे २१ पोलिसांच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना चवदार तळ्याच्या प्रांगणामध्ये मानवंदना देण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री संजय शिरसाट, फलोत्पादन, रोजगार हमी, खार जमीन विकास मंत्री भरतशेट गोगावले, विविध शासकीय अधिकारी आणि बाबासाहेबांची लेकरे उपस्थित होती. त्यानंतर महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे व अन्य मान्यवर उपस्थित होते. राज्याचे मुख्यमंत्री यांनी प्रथम बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन केले. त्यानंतर महाडच्या ऐतिहासिक भूमीवर असलेल्या भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यावर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली. या पुतळ्याच्या खाली “हा संगर केवळ पाण्यासाठी नसून मानवी मूलभूत हक्कांसाठी आहे” असे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिले आहे. बाबासाहेबांच्या पुतळ्याच्या समोर २० मार्च ही तारीख झेंडूंच्या फुलांनी सजवलेली होती, तर बाजूने झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. त्यामुळे बाबासाहेबांचा पुतळा अधिक आकर्षित दिसत होता. चवदार तळ्याच्या बाजूच्या काठावर झेंडूंच्या फुलांच्या माळा करून लावल्या होत्या. बाजूने मंडप उभारले होते. स्मारक फुलांनी सजवले होते. उपस्थित आंबेडकरी अनुयायांना बसण्यासाठी व्यवस्था केली होती, तर चवदार तळ्याच्या बाजूने आकर्षक सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आलेली होती. त्यामुळे चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या बाबासाहेबांच्या आठवणींना पुन्हा उजाळा मिळाला. प्रत्येक आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांना अभिवादन करीत होता. त्या परिसरात आंबेडकरी साहित्याची पुस्तके सवलतीच्या दरात विक्रीस ठेवण्यास आलेली होती. अनेक आंबेडकरी नेत्यांच्या सभा परिसरात सुरू होत्या. त्यात गायन पार्टीचा कार्यक्रम जोरात चालू होता. अनेक आंबेडकरी कार्यकर्ते बाबासाहेबांची गाणी ऐकण्यात गुंग होते. भीम सैनिकांच्या प्रचंड गर्दीने पूर्ण परिसर फुलून गेला होता. कडक उन्हाची तमा न मानता आंबेडकरी अनुयायी बाबासाहेबांच्या नावाच्या घोषणा देऊन बाबासाहेबांचा जय जयकार करत होते. आज जे आपण माणूस म्हणून जगतो आहोत त्याचे एकमेव कारण म्हणजे बाबासाहेब होय, याची पूर्ण कल्पना त्यांना आहे. राज्याचे मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी उपस्थित आंबेडकरी अनुयांना मार्गदर्शन करताना त्यांनी या ऐतिहासिक भूमीत जीर्णोद्धाराचा संकल्प केला आहे. या ऐतिहासिक घटनेचे साक्षीदार होण्यासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून लाखो आंबेडकरी अनुयायी महाड चवदार तळ्यावर येऊन शतक महोत्सवी वर्षाचे साक्षीदार झाले आहेत. म्हणजे काल ऐतिहासिक भूमीवर भीम सैनिकांचा महासागर लोटला होता. राज्यातील अनके संस्था एकत्र येऊन या ऐतिहासिक घटनेची एक आठवण म्हणून विविध कार्यक्रम वर्षभर आयोजित करीत आहेत. काही संस्थांनी त्या ठिकाणी जाऊन शतक महोत्सवी वर्षानिमित्ताने महाड क्रांतिदिन महोत्सवाचे आयोजन केले. आपल्या राज्याच्या अर्थसंकल्पात राज्याचे मुख्यमंत्री आणि राज्याच्या अर्थमंत्री पदाचा कार्यभार सांभाळणारे देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महाड चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षानिमित्त पायाभूत सोयीसुविधांचा विकास आराखडा तयार करण्यात येणार असल्याचे ६ मार्च २०२६ रोजी घोषित केले.

## संस्कृत सुभाषित

सुभाषित – कालभोजनमारोग्यकराणां श्रेष्ठम् ॥

अर्थ : व्यवसायानुसार भोजनाची वेळ वेगळी असली तरी त्यावेळी नित्यनियमितपणे भोजन घेणे हे श्रेष्ठ असते.

## गुरु वचन

### जर मनच अशुद्ध तर...

खूप जुनी गोष्ट आहे. एकदा संत कबीर बसले होते. त्यांच्याकडे एक व्यापारी धावत आला. त्याने कबीरांना विनंती केली, ’मला तुम्हाला माझा गुरू करायचे आहे, तुम्ही मला गुरुमंत्र द्या’ तेव्हा संत कबीरांनी त्याला पैसे दिले आणि सांगितले आधी तू पटकन जाऊन दूध घेऊन ये, मग मी तुला गुरुमंत्र देतो.

त्या व्यापाऱ्याला खूप घाई होती. तो तडक धावत गेला आणि त्याने दूध कबीरांना आणून दिले. कबीरांनी त्याला एक भांडे दिले आणि सांगितले, हे दूध या भांड्यात ओत. त्याने ते भांडे घेतले, त्यात प्रचंड घाण साचली होती. त्या व्यापाऱ्याने कबीरांना ही बाब सांगितली. ते म्हणाले, बघ जर तू या खराब भांड्यात दूध टाकायला तयार नाहीस तर, मग मी तुझ्या अशुद्ध मनात राम नावाचा मंत्र कसा देऊ? ’

कबीरांनी म्हटलेले वाक्य किती खरे आहे बघा? जर तुमचे मनच शुद्ध नाही तर तुम्ही देवाचे दर्शन घेतले काय, किंवा संत सानिध्यात राहिलात काय, त्याचा काय परिणाम होणार?

संतांनीही हेच सांगितले आहे. भलेही तुम्ही पुजा नका करू, परंतु तुम्ही तुमचे आचरण, आणि मन शुद्ध ठेवा. आपण इतरांना एखाद्या कामासाठी दोष देत असतो, पण त्याची त्यामागची भूमिका समजून घेणे गरजेचे असते. आणि आपण नेमके या उलटच करतो.

आपल्या दैनंदिन कामात आपण अनेकांना भेटत असतो, यात प्रत्येक व्यक्ती आपल्याला चांगलीच भेटते असे नाही, तर प्रत्येकाचा स्वभाव वेगवेगळा असून शकतो. त्यांच्या स्वभावानुसार त्यांना काम देणे गरजेचे आहे.

बदलायची असतील तर त्यांची मने बदलण्याचा प्रयत्न तुम्ही करा. त्यांच्या मनातील कटुता कमी करा. कारण कबीरांनी म्हटल्याप्रमाणे, खराब भांड्यात ज्या प्रमाणे तुम्ही दूध नाही टाकणार त्या प्रमाणेच एखाद्याचे मन परिवर्तन झाल्याशिवाय तुम्ही त्याला बदलू नाही शकणार.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. १०९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 2 | 9 | 3 | | | |
| | 1 | 2 | 7 | | 6 | 9 | | |
| 5 | | 6 | 4 | | | | 3 | |
| 7 | | 5 | | | 9 | 4 | | |
| | 2 | | | 6 | | | 5 | |
| | | 3 | 5 | | | 6 | | 7 |
| | 7 | | | | 5 | 3 | | 1 |
| | | 8 | 6 | | 1 | 2 | 4 | |
| | | | 3 | 2 | 4 | | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. १०८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 6 | 5 | 9 | 8 | 3 | 7 | 1 |
| 3 | 9 | 7 | 1 | 6 | 4 | 5 | 2 | 8 |
| 1 | 8 | 5 | 7 | 2 | 3 | 6 | 9 | 4 |
| 7 | 4 | 8 | 9 | 3 | 2 | 1 | 5 | 6 |
| 5 | 3 | 1 | 4 | 7 | 6 | 9 | 8 | 2 |
| 2 | 6 | 9 | 8 | 1 | 5 | 7 | 4 | 3 |
| 8 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 | 6 | 9 |
| 9 | 5 | 2 | 6 | 4 | 1 | 8 | 3 | 7 |
| 6 | 7 | 4 | 3 | 8 | 9 | 2 | 1 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८९६ – आधुनिक काळातील पहिल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धा सुरू. झेम्सकोनोला याला ’ट्रिपलजम्प’मध्ये पहिले ऑलिंपिक सुवर्णपदक मिळाले.
- १९०९ – रॉबर्ट पी. आरी हा अमेरिकन उत्तर ध्रुवावर पोहोचला.
- १९१७ – अमेरिकेचा पहिल्या महायुद्धात प्रवेश.

### राष्ट्रीय

- १६६६ – शाईस्तेखानवर शिवाजी राजांचा छापा.
- १९३० – दांडी येथे महात्मा गांधींनी कायदा तोडून मीठ गोळा केले. विलेपार्ले येथे महाराष्ट्रातील पहिला मीठ सत्याग्रह पार पडला.


### जन्म

- १९१७ – कोकणी कवी रघुनाथ विष्णु पंडित यांचा जन्म.
- १९५६ – भारतीय क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांचा जन्म.

### निधन

- १५२० – राफेल (राफेलो सांझिओ) या इटालियन शिल्पकार आणि चित्रकाराचे निधन.
- १७७३ – जॉन स्ट्युअर्ट मिल या तत्त्वज्ञाचे निधन.
- १९५५ – मसुरा श्रमाचे संस्थापक धर्मभास्कर विनायक महाराज मसुरकर यांचे निधन.
- १९६९ – चौंडेमाहाराजांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन.
- १९८३ – भारताचे माजी लष्करप्रमुख जयंतीनाथ चौधरी यांचे निधन.
- २००२ – मनु छाब्रिया या दुबईस्थित उद्योगपतीचे मुंबईत निधन.
- २००५ – ज्येष्ठ अभिनेते मधुसूदन कोल्हटकर यांचे निधन.

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. १०९



**आडवे शब्द**

१. मृत्यूवर विजय मिळविणारा
४. फायदेशीर, हितावह
७. अवाजवी
१०. संगीतातील एक राग
१२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना
१४. मला
१५. रसाने भरलेले, उदा.वर्णन
१८. लबाडीचा हेतू
१९. राबता, जाणे-येणे
२१. मऊ
२२. सद्वर्तन
२३. पळसाच्या पानांची संख्या
२४. बेकरीतील एक पदार्थ
२५. लेखणी
२७. उद्याच्या नंतरचा दिवस
२८. नेभळट मनुष्य
३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. ’-- -- -- देव!’
३२. एक चर्मवाद्य
३३. वांग्याचा खमंग पदार्थ
३४. तलमसुती कापड
३६. हिंमत, धैर्य
३८. गावातील गप्पाष्टकाची जागा
३९. छोटी बैलगाडी
४१. जन्म
४२. चिनीमातीची वाटी
४२अ. घरटे (संस्कृत)
४४. पत्नी
४५. फणसातील खाद्यभाग
४६. च्या शिवाय
४८. दरवाजा, ४९. चंद्र
५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते
५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत
५४. समाचार
५५. भांडण
५६. नमस्कार
५७. नवे कोरे
५९. कमळ
६१. बासरी
६२. कोलकाताचे विमानतळ
६४. व्रत
६७. टाळ्यांचा आवाज
६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव
६९. प्रज्वलित, तापलेले

**उभे शब्द**

१. हरिण, एक नक्षत्र
२. महाभारताचे मूळ नाव
३. मृत्यूदेवता
५. लवकर, वेगाने
६. बशीचा जोडीदार
७. अभिनेता
८. चणचण
९. अखबार
११. पुरुष
१३. चाणक्यनीती
१४. वर्षाचा बारवा भाग
१६. एक मंगलवाद्य
१७. वीस दस्ते कागद
१९अ. संक्रांतीचे दान
२०. रोखलेली नजर
२२. मनाला टोचणारे दु:ख
२५. व्यायाम, परेड
२६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना
२७. पुन्हापुन्हा
२८. माळेतील मधला मोठा मणी
२९. दिल्लीचे विमानतळ
३१. निषिद्ध, त्यागलेले
३५. नव्वद अंशाच्या आतील कोन
३६. महासर्प
३७. सिंहाची उपाधी
३८. बसण्याची फळी
४०. झकास, छान
४२. अनाथच्या विरुद्ध
४३. धडक
४४. पोते
४६. गणपतीचे एक नाव
४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा
४८. राजा-राणीची सेविका
५२. लाट, झटका, हुक्की
५३. एकूण एक सर्व
५४. कडक व चिवट
५७. दरवाजा
५८. नरमच्या विरुद्ध
६०. एक गळीत धान्य
६१. पवित्र
६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव
६५. तात्पर्य
६६. दु:ख, हळहळ

उत्तर उद्याच्या अंकात

**जम्बो शब्दकोडे क्र. १०८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ.पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१. कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

उभे उत्तर : १.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९.मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२. मात्र ७३.कोर ७५.वार

## उपदेशकथा



### उपमन्यू

महर्षी धौम्य ऋषीनी आपल्या दुसऱ्या शिष्याची उपमन्युची परीक्षा घेतली. त्यांनी त्याचा आहार बंद केला. माधुकरी मागून आणल्यांनतंर गुरूने त्याला काही दिले नाही. नतंर तर माधुकरी घ्ययलाही जाऊ दिले नाही. तो गाईचे दूध प्यायला गेला तर गुरूने त्याला मानाई केली. नतंर उपमन्युने वासरांचे दूध पिऊन झाल्यावर त्याच्या तोंडाचा जो फेस गळतअसे तो प्राशन करायलासुरूवात केली. पण गूरूने त्यालाही बंदी घातली. नतंर उपमन्युने रूईच्या झाडाची पाने खाल्ली त्यामुळे त्याची दृष्टी गेली. त्यामुळे तो चालता चालता विहीरीत पडला धौम्या ऋषी त्याला शोधत तिथे आले. त्याला त्यांनी देव वैघ आश्विनीकुमारांची स्तुती करायला सांगितली. अश्विनीकुमार प्रकट झाले. त्यांनी उपमन्युला भोजन दिले. पण त्याने गुरूच्या आज्ञेशिवाय भोजन खाल्ले नाही. तेव्हा गूरू प्रसन्न झाले व आश्विन कुमार यांनी उपमन्युला दुष्टी ही दिली व सर्व विघा ही दिल्या.

कथा उपदेश : गुरूने घेतलेल्या शिष्याच्या परीक्षेत तो पास झाला की विद्या प्राप्त होतात.

## : SMS :

Brain is the most outstanding thing in world.It works 24hrs a day,365 days a year. It works from the time we are born,and stop only when we enter the exam hall!!!!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.८ | २२.४ |
| अहमदनगर | ३२.८ | २१.२ |
| अकोला | ३५.६ | २५.४ |
| अमरावती | ३४.६ | २५.३ |
| बीड | ३८ | २५.५ |
| भंडारा | ३५.१ | २४.८ |
| बुलढाणा | ३१.३ | १९.४ |
| चंद्रपूर | ३७.९ | २६.१ |
| चेन्नई | ४१.८ | ३०.२ |
| नवी दिल्ली | २९ | २०.८ |
| धुळे | ३३.१ | २१.७ |
| गोंदिया | ३४.५ | २४.७ |
| जळगाव | ३५.१ | २४.६ |
| कोल्हापूर | ३२.७ | २०.६ |
| लातूर | ३२.४ | २३.२ |
| मुंबई | ३३.७ | २६.७ |
| नागपूर | ३४.५ | २५ |
| नांदेड | ३४.७ | २३.६ |
| नंदूरबार | ३०.१ | २०.८ |
| नाशिक | ३१.५ | १९.३ |
| पुणे | ३१ | १९ |
| पंढरपूर | ३५.८ | २४.६ |
| सातारा | ३३.१ | १९.३ |
| सांगली | ३४.२ | २३.४ |
| सोलापूर | ३६.१ | २४.५ |
| वर्धा | ३६.५ | २४.८ |

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा: उत्तर सामाजिक कार्यात प्रशंसा होईल. खर्च होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** शुभ रंग : लाल, अनुकूल दिशा: पश्चिम व्यापारात, नोकरीत संपत्ति प्राप्त होईल. मुल झाल्याने आनंद होईल.

**मिथुन :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा: दक्षिण कुटूंबातील विविध मुद्यांवर विचार-विनिमयात विरोध राहील.

**कर्क :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा: उत्तर भागिदारीत प्रगतीचे योग आहेत. थकलेले पैसे वसूल होण्याची शक्यता आहे.

**सिंह :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: पश्चिम व्यक्तिगत तसेच प्रणय संबंधात सुधारणा होण्याची शक्यता आहे.

**कन्या :** हिरवा, अनुकूल दिशा: उत्तर सहचरिणीच्या प्रगतीने सामाजिक प्रतिष्ठेत वाढेल. व्यापार-उद्योग चांगला चालेल.

**तुळ :** शुभ रंग : हिरवा, अनुकूल दिशा: पश्चिम आर्थिक गणितं सुधारतील आणि व्यापारात फायदा होण्याचे योग येतील.

**वृश्चिक :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा: उत्तर उद्योगधंद्यात अपेक्षेप्रमाणे बदल घडतील. प्रवास आरामदायक होईल.

**धनु :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: दक्षिण कौटूंबिक कामात समजदारीने निर्णय घेणे आवश्यक आहे. व्यापार आणि संपत्ती विषयी कामे टाळणे शुभ राहील.

**मकर :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा: दक्षिण व्यापारीक वाद सोडवू शकाल. अपूर्ण कामे वेळेवर पूर्ण होतील.

**कुंभ :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा: उत्तर मोठयांशी वागतांनी संयम ठेवणे आवश्यक आहे. वैवाहिक कार्यकमांचे वातावरण राहील.

**मीन :** शुभ रंग : पांढरा, अनुकूल दिशा: उत्तर अधिकाऱ्यांमध्ये आपले वर्चस्व वाढेल. व्यापारासंबंधी केलेल्या तडजोडी फायद्याच्या राहतील.

## पंचांग



| | |
|---|---|
| पंचांग | नक्षत्र:अनुराधा |
| ६ एप्रिल २०२६ | २६:५६:२७+ |
| सोमवार | योग:सिद्ध १५:२४:४६ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव १४:१०:५३ |
| श्रावणशके संवत्– १९४८ | करण:कौलव |
| संवत्सर –पराभवनाम | २७:२१:४६+ |
| अयन– उत्तरायणारंभ | सूर्य:मीन |
| मास– चैत्र | चन्द्र:वृश्चिक |
| ऋतु– सौर वसंत | हिजरी सन् – १४४५ |
| कृष्ण पक्ष | मुस्लिम मास – शव्वाल |
| तिथि:चतुर्थी १४:१०:५३ | तारीख – १७ |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे...



## मधुमेह पीडीतांना लो गो शुगर फ्री पॅकेट्सचे विनामूल्य वाटप

डोंबिवली (दैनिक संध्या) : सध्या बऱ्याच नागरिकांना शुगरचा त्रास असतोच, तो शुगरचा त्रास कमी होण्यासाठी लो गो शुगर फ्री पॅकेट्सचा वापर केला जातो.चहा,कॉफी,सेरेलॅक, फ्रुट,केक, मिठाई, पुडिंग्ज अशा अनेक पदार्थांमध्ये साखरेला उत्तम पर्याय म्हणून वापरले जाते.यावेळी जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने डोंबिवली येथील एमआयडीसी निवासी भागातील सिद्धिविनायक मंदिरात तसेच सावळाराम महाराज म्हात्रे क्रीडा संकुलातील मधुमेह पीडीतांना लो गो शुगर फ्री पॅकेट्सचे विनामूल्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर, खजिनदार दत्ता कडुलकर, संस्थेचे जेष्ठ सल्लागार-अरविंद सुर्वे, हिंद सेना फाउंडेशनचे अध्यक्ष जयेश दाभोळकर, समाजसेवक बाळकृष्ण देसाई, मंगेश खोत हे उपस्थित होते.हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी जेष्ठ सल्लागार-अरविंद सुर्वे यांचे विशेष सहकार्य लाभले.या स्तुत्य उपक्रमाचे बऱ्याच नागरिकांनी कौतुक केले.

## 'सोशल मीडिया' वरील संशोधनासाठी माहिती संचालक किशोर गांगुर्डे यांना पीएच.डी.



पुणे (दैनिक संध्या) : राज्याचे माहिती आणि जनसंपर्क संचालक किशोर गांगुर्डे यांना जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने 'वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन' विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते श्री. गांगुर्डे यांना पीएच.डी. पदवीची अधिसूचना देऊन सन्मानित करण्यात आले. 'महाराष्ट्र शासनाच्या माहिती प्रसारणासाठी समाजमाध्यमांचा वापर आणि प्रभाव : एक अभ्यास' (A Study on the Use and Impact of Social Media for Information Dissemination by the Government of Maharashtra) या विषयावर श्री. गांगुर्डे यांनी संशोधन करुन शोधप्रबंध सादर केला होता. शासनाचे निर्णय, लोकाभिमुख योजना, धोरणे आणि माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात समाजमाध्यमांची भूमिका किती प्रभावी ठरते, याचे सखोल विश्लेषण त्यांनी या संशोधनात केले आहे. या संशोधनासाठी त्यांना विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळेचे माजी संचालक प्रा. डॉ. सुधीर भटकर यांचे मार्गदर्शन लाभले. राज्य शासनाच्या सेवेतील जनसंपर्क व प्रसिद्धीविषयक कामाचा दोन दशकांपेक्षा अधिक कालावधीचा अनुभव तसेच माहिती व जनसंपर्क विभागात सोशल मीडिया शाखेची त्यांनी केलेली सुरुवात यामुळे श्री. गांगुर्डे यांचे हे संशोधन महत्त्वाचे मानले जाते. शासकीय माहिती प्रसारासाठी शासनात सोशल मीडियाची सुरुवात करुन उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 2018 मध्ये नागरी सेवा दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गांगुर्डे यांना सन्मानित करण्यात आले आहे.



## ईस्टर संडे निमित्त पवित्र नाम देवालय चर्चमध्ये विशेष प्रार्थना आणि भक्ती गीत

पुणे (दैनिक संध्या) : प्रभू येशूचे पुनरुत्थान चा दिवस ईस्टर संडे रविवार हा दिवस दुःखाकडून आनंदाकडे जाण्याचे प्रतीक मानले जाते. हा दिवस ईस्टर संडे म्हणून साजरा केला जातो. गुरुवार पेठ पुणे पंच हौद येथील पवित्र नाम देवालय चर्चमध्ये विशेष प्रार्थना सभेचे आयोजन आणि भक्ती गीत सादर करण्यात आले होते. सकाळी सुवार्ता मिरवणूक झाली. यावेळी कार्यक्रमाचे आयोजन सचिव.मनोज येवलेकर, विकास उमापती, विजया इंदूरकर, रॉसमेरी साठे, शिरिश पाठक, प्रशांत सूर्यवंशी, प्राजक्ता परोल, कौमुदी येवलेकर, यांनी केले. तसेच संदीप गायकवाड, विलसन चक्रे, पवन भोगे, राजेंद्र पवार, यांचे सहकार्य लाभले. यावेळी रेव्ह. अशोक कॅरप, रेव्ह.जयंत गायकवाड, रेव्ह. जयप्रकाश आढाव, विशाल पाटोळे, तेजस हिंगे, निखिल टाकळकर, साहिल येवलेकर, हर्षल आव्हाड, तेजस मुदलियार, प्रतीक परोल, रीची थोरात, उदय राठोड, ऑस्टीन नवगिरे, शलमोन सूर्यवंशी , जया पाटोळे, शारोन साळवी, नमन सूर्यवंशी, गौरव अमोलिक , अर्पण उमापती , सुशांत जाधव, ऑल्विन साळवी. हे सहभागी होते.

# पुणे विद्यापीठात भटके विमुक्त कवी संमेलन





पुणे (दै. संध्या)


भटके विमुक्तांचे पहिले अभ्यास केंद्र सावित्रीबाई फुले विद्यापीठात प्रथमच आजपासून सुरू होत आहे. हुतात्मा हरी मकाजी नाईक यांच्या पुण्यतिथी दिनी ही ऐतिहासिक घटना घडत आहे. या अभ्यास केंद्रामार्फत समाजातील तरुणांना दिशा मिळणार आहे तसेच काव्य बोले काळजाला म्हणत समाज प्रबोधन करणाऱ्या साहित्यसम्राट पुणे संस्थेच्या कवीसंमेलनामुळे आज उपस्थित सर्वांना वैचारिक ऊर्जा सुद्धा मिळणार आहे. याची मला खात्री आहे. असे विचार कार्यक्रमाचे अध्यक्ष आणि विद्यापीठाचे प्र. कुलगुरू पराग काळकर यांनी उद्घाटन प्रसंगी व्यक्त केले.

हुतात्मा हरी मकाजी नाईक यांच्या पुण्यतिथी दिनी मराठी भाषा भवन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ या ठिकाणी भटके विमुक्त अभ्यास केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी साहित्य सम्राट पुणे संस्थेचे भटके विमुक्त जीवन या विषयावर २१८ वे कवी संमेलन अधीसभा सदस्य कृष्णा भंडलकर यांनी आयोजित केले होते. विचार पिठावर माननीय प्र कुलगुरू डॉक्टर पराग काळकर, कृष्णा भंडलकर अधीसभा सदस्य, रवींद्र शिगणापुरकर, प्रा.डॉ. डी.बी. पवार, प्रा. डॉ.विलास आढाव, प्रा. डॉ. गीता शिंदे, प्रा. डॉ.सुनील भडंगे आणि साहित्यसम्राटचे संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांच्या मार्गदर्शनानंतर कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते उद्धवजी काळे यांनी भटके विमुक्तांचा जीवनप्रवास, क्रांतीकारकांचा इतिहास, संघटनांचे कार्य सांगताना भविष्यात सर्व भटके विमुक्त समाज एकत्र येतील आणि तरुणांना दिशा देण्यासाठी अधिक जोमाने समाजसेवा करतील असा विश्वास आपल्या भाषणातून व्यक्त केला. दुसऱ्या सत्रात प्रबोधनात्मक आणि उत्स्फूर्त कवी संमेलनामध्ये अजूनही समाजातील अनेक घटकांना स्वातंत्र्य कळालेच नाही या आशयाची १६ ऑगस्ट ओरडला या कवितेला टाळ्यांच्या गजरात काव्य रसिकांकडून विशेष दाद मिळाली.

या कवी संमेलनामध्ये कवी राहुल भोसले यांनी गोरगरिबांचा कैवारी हरी मकाजी नाईक यांच्या जीवनावरील कविता, बाळकृष्ण अमृतकर यांनी भटके विमुक्तांचे जीवन दाखवणारी कविता, योगेश भोरे यांनी वास्तव जीवनावरील भाष्य करणारी कविता, जगदीप वनशिव यांनी माणसाला माणूस पण शिकवणारी कविता, कवयित्री रेखा दुसाने यांनी भटके विमुक्तांचे जगणे यावर भाष्य करणारी कविता प्रिया दामले, विजय सातपुते, रामचंद्र पाचुनकर, ऋषिकेश कोल्हे, रेखा दुसाने नंदकिशोर गावडे, गीता शिंदे अशा अनेक कवी कवयित्री यांनी भटके विमुक्त जीवन, समाज, आणि त्यांचा इतिहास अशा विषयांवरील परखड आणि बहारदार कविता सादर करून काव्य रसिकांची मनी जिंकली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृष्णा भंडलकर यांनी, कवी संमेलनाचे सूत्रसंचालन विनोद अष्टुळ आणि तर आभार डॉ.गीता शिंदे तसेच बाबासाहेब दूधभाते यांनी केले.

## 'तुम से तुम तक' देवळातील हटके प्रसंगासह परत आणत आहे शोलेचा चार्म!



पुणे (दै. संध्या)

झी टीव्हीवरील 'तुम से तुम तक' ही मालिका आपल्या रोचक कथानक आणि आगळ्यावेगळ्या मांडणीमुळे प्रेक्षकांना खिळवून ठेवत आहे. अलीकडेच या मालिकेत हिंदी चित्रपटसृष्टीतील शोले या गाजलेल्या चित्रपटातील एका अजरामर प्रसंगाला हलक्याफुलक्या आणि आधुनिक ढंगात आदरांजली देण्यात आली असून त्यामुळे कथानकात जुन्या आठवणी आणि खास आकर्षण निर्माण झाले आहे. हा प्रसंग मूळ क्लासिक सीनची झलक जपून आर्य (शरद केळकर) आणि अनु (निहारिका चौक्सी) यांच्या कथाविश्वात अतिशय सहजपणे गुंफण्यात आला आहे. खोडकरपणा आणि निरागसतेचा हलकाफुलका स्पर्श असलेला हा क्षण नेहमीच्या गंभीरपणापासून थोडा वेगळा ठरतो आणि प्रेक्षकांना ताजेपणाची अनुभूती देतो. जुन्या सिनेमांची आठवण करून देणारा हा प्रसंग आधुनिक कथाकथनाशी सुंदररीत्या जोडला गेल्यामुळे तो अधिक संस्मरणीय आणि मनोरंजक ठरतो. या प्रसंगाच्या चित्रीकरणाचा अनुभव सांगताना निहारिका चौक्सी म्हणाली, "हे दृश्य चित्रीत करताना खूप मजा आली कारण नेहमीपेक्षा त्याची एकदम वेगळी आणि खेळकर छटा होती. त्यामध्ये एक खास नॉस्टॅल्जिया होता आणि इतक्या गाजलेल्या सिनेमातील प्रसंगापासून प्रेरित काहीतरी साकारताना तो क्षण आणखी खास वाटला. हा आमच्यासाठी एक ताजातवाना बदल होता आणि कलाकार म्हणून ती ऊर्जा पडद्यावर आणताना आम्हांला खूप आनंद झाला. प्रेक्षकांनाही हा हलका-फुलका, आनंद देणारा प्रसंग नक्कीच आवडेल अशी मला आशा आहे."

## तुरुंग ट्रॅक त्याच्यासाठी मानसिकदृष्ट्या खूप थकवणारा ठरला!



पुणे (दै. संध्या)

झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकेत भरत अहलावत्त (राघव) आणि आयुषी खुराणा (रीत) यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सध्या ही मालिका एका अत्यंत रोचक टप्प्यावर पोहोचली आहे. ह्या कथानकात रीत ही राघवला तुरुंगातून बाहेर काढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करताना दिसत आहे कारण त्याच्यावर किर्ती (गौरी अगरवाल) हिच्या खुनाचा खोटा आरोप करण्यात आला आहे. अलीकडे भरत अहलावत तुरुंगातील तीव्र दृश्यांचे चित्रीकरण करत आहे ज्यात त्याच्या व्यक्तिरेखेवर शारीरिक छळ केले जातात. या शारीरिक तणावासोबतच आपली गरोदर पत्नी बाहेर संघर्ष करत असताना स्वतः तुरुंगात अडकलेला राघव अनुभवत असलेला भावनिक कल्लोळही या कथेत दाखवण्यात आला आहे. त्यामुळे तो आपली पत्नी आणि अजून जन्म न झालेल्या बाळाबाबत चिंतेत आहे. या दृश्यांबाबत बोलताना भरतने सांगितले की ही दृश्ये शारीरिकदृष्ट्या जितकी कठीण आहेत, तितकीच ती कलाकार म्हणून मनावरही मोठा ताण आणणारी आहेत.

भरत म्हणाला, "हा संपूर्ण तुरुंग ट्रॅक खूपच तीव्र आहे. त्यात अनेक फ्लॅशबॅक आणि भावनिकदृष्ट्या थकवणारे क्षण आहेत. एका प्रसंगात माझी व्यक्तिरेखा राघवला योग्य आणि अयोग्य यामधील निवड करावी लागते आणि त्यासाठी तो रीतकडे मदत मागतो. दुसरीकडे रीतही एका अडचणीत सापडलेली असते आणि ती माझी मदत मागते. आम्ही दोघेही योग्य काय आहे आणि काय करावे याच्या दुविधेमध्ये सापडतो. हे इंटरकट्स कदाचित फार मोठे नसतील पण ते अतिशय सुंदर पद्धतीने चित्रीत करण्यात आले आहेत. अशा प्रकारची दृश्ये सलग अनेक दिवस चित्रीत करणे एखाद्या अभिनेत्यासाठी भावनिकदृष्ट्या थकवणारे असते पण कलाकार म्हणून मला अधिक परिपक्व होण्यास त्याची मदत होते."

सध्या सुरू असलेल्या या ट्रॅकला प्रेक्षकांची मोठी पसंती मिळत आहे. किर्ती जीवंत असल्याचे उघड झाले असून राघववर खुनाचा खोटा आरोप लावण्यासाठी शारदा (जयती भाटिया) आणि किर्ती यांनी एक योजनाबद्ध कट रचल्याचे समोर आले आहे. आता सत्य समजल्यावर रीत किर्तीचा शोध घेऊन तिला न्यायालयात हजर करण्याचा निर्धार करते, जेणेकरून राघवचा निरपराधपणा सिद्ध करता येईल. शारदा आणि किर्ती एकत्र आल्याने राघव आणि रीतसाठी परिस्थिती आणखी बिकट होणार की ते या संकटावर मात करतील हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. हे सर्व नाट्य पहा 'जाने अनजाने हम मिले' रात्री 10:30 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## भटक्या विमुक्तांना सामाजिक, आर्थिक स्थैर्य मिळावे : उद्धव काळे

### गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघातर्फे स्नेहमेळावा, वधू-वर परिचय संमेलनाचे आयोजन





पुणे (दै. संध्या)

"स्वातंत्र्यानंतरही गोंधळी व भटक्या-विमुक्त समाजाला मुख्य प्रवाहात येण्यासाठी झगडावे लागत आहे. गावोगाव भटकंती करून गुजराण करणाऱ्या, पालांवर, वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या या समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक स्थैर्य मिळायला हवे. त्यातूनच या समाजाच्या अडचणी दूर होऊन पुढील पिढ्या घडतील," असे मत भटके विमुक्त विकास परिषद व प्रतिष्ठानचे अध्यक्ष उद्धव काळे यांनी व्यक्त केले.

गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती विकास संघ आणि अखिल भारतीय गोंधळी समाज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित स्नेहमेळावा व वधू-वर परिचय संमेलनात उद्धव काळे बोलत होते. गोंधळी समाजातील पहिले महापौर झाल्याबद्दल इचलकरंजीचे महापौर उदय धातुंडे यांचा विशेष सन्मान करण्यात आला. कवड्याची माळ, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे सत्काराचे स्वरूप होते. स्नेहमेळाव्याला १५०० समाजबांधवांनी, तर वधू-वर परिचय संमेलनात ३५० मुलामुलींनी सहभाग नोंदवला.

म्हात्रे पुलाजवळील शुभारंभ लॉन्स येथे आयोजित या स्नेहमेळाव्याला भारतीय जनता पार्टीचे प्रदेश प्रवक्ता संदीप खर्डेकर, नगरसेवक सुरज लोखंडे, दीपक नागपुरे, तहसीलदार संजय भोसले, गोंधळी व भटक्या विमुक्त जाती-जमाती संघाचे अध्यक्ष परेश गरुड, अखिल भारतीय गोंधळी समाजाचे अध्यक्ष राजेंद्र वनारसे, सदस्या रजनी पाचंगे, मुकुंद यदमळ, हरीष पाचंगे आदी उपस्थित होते. गोंधळ व संबळ वादन सादरीकरणाने स्नेहमेळाव्याची सुरुवात झाली.

उद्धव काळे म्हणाले, "आपल्या समाजाचे सांस्कृतिक महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या समाजाच्या उत्थानासाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांचा लाभ आपल्या समाजातील अनेक घटकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. माहितीचा अभाव, प्रशासकीय अडचणी आणि मार्गदर्शनाची कमतरता यामुळे अनेक पात्र लाभार्थी वंचित राहतात. त्यामुळे केवळ योजना जाहीर न करता त्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी होईल, यासाठी विशेष लक्ष द्यायला हवे."

उदय धातुंडे म्हणाले, "समाजाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी शासन, सामाजिक संस्था आणि समाजबांधव यांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. तेव्हाच आपल्या समाजाला खऱ्या अर्थाने न्याय आणि समान संधी मिळू शकतील. आजचा मेळावा समाजाला एकत्र आणणारा आणि नातेसंबंध दृढ करणारा उपक्रम आहे. यातून अनेक कुटुंबे एकमेकांच्या संपर्कात येतात. अनेक विवाह जुळून येतात, ही अत्यंत आनंददायी आणि सकारात्मक बाब आहे."

## कलाकारांनी उलगडला भावंडांच्या अटूट नात्याचा सुंदर प्रवास

पुणे (दै. संध्या)



भावंडांचा संबंध हा आयुष्यातील सर्वात मोठ्या आशीर्वादांपैकी एक आहे. या नात्यात प्रेम, हसू, भांडणं आणि कायम साथ असते. ते आपले पहिले मित्र, मोठे प्रतिस्पर्धी आणि आयुष्यभर साथ देणारे सोबती असतात. सिब्लिंग्स डे जवळ येत असताना, या नात्यांचा सन्मान करण्याची आणि आठवणी जपण्याची ही योग्य वेळ आहे. &TV वरील कलाकार सीरत कपूर (सावी, घरवाली पेडवाली) आणि विदिशा श्रीवास्तव (अनिता भाभी, भाभीजी घर पर हैं 2.0) त्यांच्या भावंडांबरोबरच्या नात्याबद्दल सांगतात. सीरत कपूर म्हणतात, "माझा लहान भाऊ फक्त कुटुंब नाही. तो माझा सर्वात मोठा पाठीराखा आहे. आम्ही लहानपणी खूप स्वप्नं पाहिली, भांडणं केली आणि सुंदर आठवणी तयार केल्या. माझ्या अभिनयाच्या प्रवासात तो नेहमी माझ्या पाठीशी उभा राहिला. त्याचा माझ्यावरचा विश्वास मला पुढे जाण्याची प्रेरणा देतो. त्याची मस्करी आणि कठीण वेळेत दिलेला आधार मला खूप महत्त्वाचा आहे. या सिब्लिंग्स डे निमित्त मी त्याचे आभार मानते."विदिशा श्रीवास्तव म्हणतात, "माझी लहान बहीण शानवी माझ्यासाठी खूप महत्त्वाची आहे. आम्ही फक्त बहिणी नाही, तर एकमेकींचा आधार आहोत. बालपणापासून ते आयुष्यातील आव्हानांपर्यंत आम्ही नेहमी एकत्र राहिलो आहोत. तिच्या सोबतीमुळे कठीण प्रसंगही सोपे वाटतात. ती मला दररोज प्रेरणा देते. मी खूप भाग्यवान आहे की मला अशी बहीण मिळाली आहे जी मला न बोलताही समजते."

# झायडस पिंकाथॉन पुणे आठव्या पर्वासह परतले

**आरोग्य आणि चिकाटीच्या या उत्सवात ४,५०० हून अधिक महिलांचा सहभाग**



पुणे (दै. संध्या)

सात वर्षांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर पुन्हा एकदा दिमाखात परतलेल्या 'झायडस पिंकाथॉन पुणे'ने रविवारी AFMC मैदानावर ४५०० हून अधिक महिलांना एकत्र आणले. या सोहळ्याने शहराची धावण्याची सुदृढ संस्कृती आणि महिलांचे आरोग्य व तंदुरुस्ती यांप्रती वाढती कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली. पहाटेच्या वेळी सुरू झालेल्या या स्पर्धेत ३ किमी, 'लाईफलाँग' ५ किमी आणि १० किमी अशा शर्यतींच्या श्रेणींचा समावेश होता. तसेच ५० किमी, ७५ किमी, १०० किमी आणि १०० किमी रिले अशा 'अल्ट्रा-डिस्टन्स' (अति-दीर्घ अंतराच्या) शर्यतीही यात घेण्यात आल्या. या स्पर्धेत विविध वयोगट, क्षमता आणि तंदुरुस्तीच्या विविध पातळ्यांवरील सहभागींचे स्वागत करण्यात आले.

या कार्यक्रमाचा औपचारिक शुभारंभ पुणे शहराच्या सन्माननीय महापौर श्रीमती मंजुषा नागपुरे, 'पिंकाथॉन'चे संस्थापक मिलिंद सोमण आणि 'इन्व्हिन्सिबल वुमेन'च्या संस्थापिका अंकिता कोंवर यांसारख्या मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. महिलांचे आरोग्य, सुरक्षा आणि सक्रिय जीवनशैलीला चालना देणारी एक शहरव्यापी चळवळ म्हणून या कार्यक्रमाचे महत्त्व याप्रसंगी अधोरेखित करण्यात आले. याच भावनेचे प्रतिबिंब म्हणून, या कार्यक्रमात अत्यंत उत्साहपूर्ण सहभाग दिसून आला. ज्यामध्ये पहिल्यांदाच धावणाऱ्या नवख्या धावपटूंनी अनुभवी आणि दीर्घ पल्ल्याच्या शर्यतींमध्ये पारंगत असलेल्या खेळाडूंसोबत एकाच मार्गावर धाव घेतली. या कार्यक्रमाच्या ठळक वैशिष्ट्यांमध्ये २० दृष्टिहीन धावपटू, ५० हून अधिक कर्करोगावर मात करणारे व्यक्ती, ३ किलोमीटरच्या गटात आपल्या बाळांना सोबत घेऊन धावणाऱ्या १५ माता आणि आयुष्यभर तंदुरुस्तीचा ध्यास जोपासणारे ज्येष्ठ नागरिक यांचा समावेश होता. या सर्वांनी मिळून 'पिंकाथॉन'ची सर्वसमावेशकता आणि जनसहभागाप्रती असलेली कटिबद्धता अधिकच दृढ केली.

पुणे येथील या धावण्याच्या शर्यतीला एक आगळीवेगळी ओळख मिळवून देण्याचे काम, प्रत्येक श्रेणीचे प्रतिनिधित्व करणाऱ्या 'मॅस्कॉट्स'च्या (प्रतीक-व्यक्तींच्या) एका दमदार फळीने केले. पारंपरिक नऊवारी साडी नेसून 'सुपर ७५ किमी' गटात धावणाऱ्या मृणाल इनामदार यांनी सांस्कृतिक सामर्थ्य आणि चिकाटीचे मूर्तिमंत रूप साकारले, तर दृष्टीहीन धावपटू ललिता पवार यांनी ५० किमी गटाचे नेतृत्व केले. १०० किमी अंतराच्या गटाचे प्रतिनिधित्व ६१ वर्षीय ईएनटी (कान-नाक-घसा) तज्ज्ञ डॉ. नीलम वैद्य यांनी केले. त्यांनी वयाच्या कोणत्याही टप्प्यावर टिकून राहणाऱ्या जिद्दीचे प्रतीक म्हणून आपली छाप पाडली.

कमी अंतराच्या गटांमध्ये, कर्करोगावर मात केलेल्या डॉ. मिताली उपाध्ये यांनी १० किमी शर्यतीचे प्रतिनिधित्व केले. ८७ वर्षीय उषा सोमण यांनी 'लाईफलाँग ५ किमी' गटाचे नेतृत्व केले आणि आपल्या बाळाला सोबत घेऊन धावणाऱ्या मयूरी दास यांनी ३ किमी गटाचे प्रतिनिधित्व केले. या सर्वांनी मिळून 'पिंकाथॉन' चळवळीतील विविधता आणि तिचा चैतन्यमय उत्साह प्रभावीपणे अधोरेखित केला.


स्पर्धेच्या निकालांमध्ये, ३ किमी गटात पियुषा लोहारने १३ मिनिटे २० सेकंदांच्या वेळेसह प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या पाठोपाठ ओवी पाटील आणि मायरा मोनिका साठे यांनी स्थान मिळवले. 'लाईफलाँग ५ किमी' शर्यतीत कृतिका चव्हाणने २३ मिनिटे ३४ सेकंदांच्या वेळेसह प्रथम क्रमांक मिळवला, तर वंदना ठाकूर आणि सारिका यादव यांनी अनुक्रमे दुसरे व तिसरे स्थान पटकावून विजेत्यांच्या यादीत स्थान निश्चित केले. १० किमी शर्यतीत निशा पासवान ४१ मिनिटे ४९ सेकंदांच्या वेळेसह विजयी ठरली; तिच्या पाठोपाठ पद्मा करांडे आणि अभिलाषा मोडेकर यांनी शर्यत पूर्ण केली.

कार्यक्रमानंतर बोलताना, 'पिंकाथॉन'चे संस्थापक मिलिंद सोमण म्हणाले, "पुणे हे नेहमीच धावण्याच्या संस्कृतीसाठी ओळखले जाणारे शहर राहिले आहे आणि आज आम्हाला प्रत्यक्ष मैदानावर या संस्कृतीचे रूपांतर एका अविश्वसनीय ऊर्जेमध्ये झालेले पाहायला मिळाले. या कार्यक्रमाची केवळ भव्यताच नव्हे, तर त्यातील विविधताही विशेष लक्षवेधी ठरली, ज्यामध्ये पहिल्यांदाच ३ किमी धावण्याचा प्रयत्न करणाऱ्या महिलांपासून ते 'अल्ट्रा-डिस्टन्स' धावण्याचे आव्हान स्वीकारणाऱ्या महिलांपर्यंत सर्वांचा समावेश होता. सात वर्षांनंतर झालेले हे पुनरागमन या उपक्रमाला अधिकच अर्थपूर्ण बनवते. कारण यातून हे सिद्ध होते की, आरोग्याला प्राधान्य देण्याची जिद्द किंवा उद्देश अजिबात मावळलेला नाही, उलट तो अधिकच दृढ झाला आहे."

# शाओमीकडून प्रीमियम डिझाइनसह ‘रेडमी नोट १५ स्पेशल एडिशन’ लाँच

**पुणे (दै. संध्या) :**

शाओमी इंडियाने प्रीमियम डिझाइन, दमदार बॅटरी आणि एआय-आधारित वैशिष्ट्यांनी सुसज्ज ‘रेडमी नोट १५ स्पेशल एडिशन’ स्मार्टफोन लाँच केला आहे. हा स्मार्टफोन वापरकर्त्यांच्या दैनंदिन गरजा, कंटेंट निर्मिती आणि मनोरंजन अनुभव अधिक सुलभ करण्याच्या उद्देशाने डिझाइन करण्यात आला आहे. या स्मार्टफोनमध्ये ६.७७ इंच कर्व्ह्ड AMOLED डिस्प्ले देण्यात




आला असून FHD+ रिझोल्यूशन आणि १२०Hz पर्यंत रिफ्रेश रेटमुळे ब्राउझिंग, गेमिंग आणि व्हिडिओ पाहताना उत्कृष्ट व्हिज्युअल अनुभव मिळतो. जवळपास ३२०० निट्स ब्राइटनेस आणि विस्तृत कलर गॅमूटमुळे कोणत्याही प्रकाशात स्पष्ट दृश्यता मिळते. ७.३५ मिमी जाडी आणि १७८ ग्रॅम वजनामुळे हा फोन आकर्षक आणि हाताळायला सोपा आहे. कामगिरीच्या बाबतीत, हा फोन ४nm तंत्रज्ञानावर आधारित स्नॅपड्रॅगन ६ जेन ३ प्रोसेसरने सुसज्ज असून मल्टिटास्किंग आणि गेमिंगसाठी सक्षम आहे. कॅमेऱ्याच्या बाबतीत ५० मेगापिक्सेल एआय ड्युअल रिअर कॅमेरा आणि २० मेगापिक्सेल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. एआय इरेज, एआय स्काय, बोकेह आणि रिफ्लेक्शन रिमूव्हलसारखी फीचर्स फोटो एडिटिंग अधिक सोपी करतात. ५८०० mAh क्षमतेची बॅटरी आणि ४५ वॅट टर्बो चार्जिंगमुळे हा फोन दिवसभर सहज चालतो. याशिवाय ड्युअल स्पीकर्स, डॉल्बी ॲटमॉस, एआय नॉईज कॅन्सलेशन आणि ५जी कनेक्टिव्हिटीसह हा फोन मल्टिमीडिया अनुभव अधिक समृद्ध करतो. सुरक्षेसाठी इन-डिस्प्ले फिंगरप्रिंट सेन्सर आणि एआय फेस अनलॉक देण्यात आला आहे. तसेच हा फोन आयपी६५/६६ रेटिंगसह धूळ आणि पाण्यापासून सुरक्षित आहे. एमआयएल-एसटीडी - ८१०एच प्रमाणनामुळे टिकाऊपणाही वाढवण्यात आला आहे. कंपनीकडून ४ वर्षांचे अँड्रॉईड अपडेट्स आणि ६ वर्षांचे सिक्युरिटी अपडेट्स दिले जाणार आहेत. हा स्मार्टफोन ७ एप्रिल २०२६ पासून फ्लिपकार्ट आणि mi.com वर उपलब्ध होणार असून आयसीआयसीआय बँकेच्या ऑफर्ससह नो-कॉस्ट ईएमआयची सुविधाही मिळणार आहे.


**किंमत व उपलब्धता:**

६GB + १२८GB : ₹२४,९९९ (ऑफर किंमत ₹१९,९९९, प्रभावी ₹१७,९९९)
८GB + १२८GB : ₹२५,९९९ (ऑफर किंमत ₹२१,९९९, प्रभावी ₹१९,९९९)
८GB + २५६GB : ₹२७,९९९ (ऑफर किंमत ₹२३,९९९, प्रभावी ₹२१,९९९)

## TECNO SPARK 50 5G आजपासून विक्रीसाठी उपलब्ध

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

TECNO SPARK 50 5G आजपासून भारतात विक्रीसाठी उपलब्ध झाला आहे. 4GB + 128GB व्हेरिएंटची किंमत ₹16,999 असून 6GB + 128GB मॉडेल ₹18,999 मध्ये उपलब्ध आहे. हा स्मार्टफोन Flipkart तसेच देशभरातील रिटेल स्टोअर्समध्ये त्वरित खरेदी करता येतो. याशिवाय 8 महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट EMI पर्यायही उपलब्ध आहे. TECNO Spark 50 5G हा सतत चार्जर शोधण्याच्या त्रासाला कंटाळलेल्या वापरकर्त्यांसाठी खास बनवला आहे. यामध्ये 6500mAh ची मोठी बॅटरी देण्यात आली आहे, जी




दिवसभर जोरदार वापरातही टिकते. तसेच मिलिटरी-ग्रेड ड्रॉप प्रोटेक्शन आणि स्प्लॅश व डस्ट रेटिंगमुळे हा फोन पडणे किंवा अचानक पावसात भिजणे अशा परिस्थितीतही सुरक्षित राहतो. डिझाइनच्या बाबतीत, हा फोन नैसर्गिक रंगांपासून प्रेरित आहे आणि टिकाऊपणासह आकर्षक लुक देतो. तो Fantasy Purple, Mint Green, Champagne Gold आणि Ink Black या चार रंगांमध्ये उपलब्ध आहे.

## जाहीर नोटीस

**मे. अप्पर जिल्हाधिकारी साहेब पुणे, यांचे न्यायालयात.**
**सी. विंग, पाचवा मजला, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, पुणे स्टेशन, पुणे-४११००१.**

आर.टी.एस. अपील नं -१६३०/२०२५
दि. २३/३/२०२६

**नोटीस**

(१) **श्री. विश्वनाथ अशोक नलावडे**
वय - ३९ वर्ष, धंदा नोकरी,
रा. मु. पो. धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे -४१२४०९.

(२) **सौ. दमयंती राहुल टेमगिरे**
वय - ३६ वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. विघ्नहर निवास, ममता नगर,
जुनी सांगवी जि. पुणे - ४११०२७.

(३) **सौ. रसवंती अजित पानसरे**
वय - ४२ वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. सई प्रेस्टीज, फ्लॅट नं. ०९,
ओतूर, ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९.

(४) **श्री. श्याम यशवंत नलावडे**
वय - ४५ वर्ष, धंदा नोकरी, **अपिलार्थी**
रा.जे.के. असोसियेट, अ विंग ०६,
एकतानगर पुणे नाशिक रोड
चाकण, ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.

(५) **श्री. अविनाश यशवंत नलावडे**
वय - ४१ वर्ष, धंदा - नोकरी,
रा.जे. के. असोसियेट, अ विंग ०६,
एकतानगर पुणे नाशिक रोड चाकण
ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.

(६) **सौ. अनुराधा जयंत बेंडे पाटील**
वय – ४३ वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. अहिल्या टावर १२, अशोक नगर कनकश्री
हॉलच्या जवळ, कांदिवली इस्ट मुंबई ४००१०१

(७) **शुभदा यशवंत नलावडे उर्फ सौ. शुभदा संतोष हांडे**
वय - ४० वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. १२५/१/अ राज सोसायटी ज्ञानेश्वर उद्यान, कल्पवृक्ष
अपार्टमेंट जवळ, कोथरूड, पुणे ४११०३८

**विरुद्ध**

(१) **श्री. दिलीप रामभाऊ मुंढे**
वय - सज्ञान वर्ष, धंदा – शेती,
रा. मु. पो. धोलवड, मुंढेवाडी,
ता. जुन्नर, जि. पुणे-४१२४०९

(२) **सौ. सविता दिलीप मुंढे**
वय – सज्ञान वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. मु. पो. धोलवड, मुंढेवाडी,
ता. जुन्नर, जि. पुणे-४१२४०९

(३) **सौ. वसुधा खंडेराव नलावडे**
वय-सज्ञान वर्ष, धंदा - गृहिणी,
रा. मु. पो. धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१२४०९

(४) **सुगंधाबाई भिकाजी नलावडे**
वय - सज्ञान वर्ष, धंदा - शेती,
रा. फ्लॅट नं.१ शुभम कॉम्प्लेक्स पहिला मजला,
ओतुर बस स्टॉप शेजारी, मु. पो. ओतुर,
ता. जुन्नर, जि. पुणे - ४१२४१२

(५) **श्री. नाथा महादेव नलावडे**
वय – सज्ञान, धंदा - गृहिणी,
रा. मु. पो. धोलवड, गणेशनगर,
ता. जुन्नर, जि. पुणे-४१२४०९.

(६) **श्री. अशोक भिकाजी नलावडे**
वय - सज्ञान, धंदा - नोकरी,
रा. मु. पो. धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९. **जाबदेणार**

(७) **श्रीमती. मंदा यशवंत नलावडे**
वय - सज्ञान, धंदा - गृहिणी, रा.जे. के.
असोसियेट, अ विंग ०६, एकतानगर पुणे
नाशिक रोड चाकण ता. खेड जि. पुणे - ४१०५०१.
मयत विनायक अशोक नलावडे तर्फे वारसदार म्हणून

(८) **कु. माहेश्वरी विनायक नलावडे**
वय - अज्ञान, धंदा शिक्षण,

(९) **कु. ईश्वरी विनायक नलावडे**
वय - अज्ञान, धंदा - शिक्षण,
वर नमूद क्र. ९ व १० ची अपाक म्हणून व स्वतः करिता

(१०) **श्रीमती. सीमा विनायक नलावडे**
वय - सज्ञान वर्ष, धंदा - गृहिणी,
वरील ८ ते १० रा. मु. पो. धोलवड, ता. जुन्नर, जि. पुणे – ४१२४०९.

(११) **मा. बँक व्यवस्थापक, एच.डी. एफ.सी बँक**
शाखा- नारायणगाव आणि जुन्नर
वय - सज्ञान, धंदा नोकरी,
मु. पो. नारायणगाव, खोडद रोड, ता. जुन्नर, जि. पुणे - ४१०५०४.

(१२) **महाराष्ट्र शासन तर्फे**
मा. उपविभागीय अधिकारी, मंचर
पत्ता- उपविभागीय अधिकारी कार्यालय, मंचर
ता- आंबेगाव, जि- पुणे

**अपील- महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम २४७ अन्वये**

उपविभागीय अधिकारी, जुन्नर- आंबेगाव उपविभाग पुणे त्यांचेकडील आर.टी.एस/अपिल/५५१/२०२२ अन्वये दि. १७/१०/२०२५ रोजी दिलेल्या आदेशाविरुध्द वादी यांनी या न्यायालयात दाखल केलेल्या प्रस्तुतच्या अपिलामध्ये मा. अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचेसमोर दि. २०/४/ २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी निश्चीत करण्यात आली आहे. तरी आपण आपले वकिलांसह तसेच आपलेकडील पुराव्याचे कागदपत्रांसह व सदरची नोटीस घेवुन येथील अपर जिल्हाधिकारी पुणे यांचे दालनात (जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे, ५वा मजला) उपस्थित रहावे. सदर कालावधीत संबधित अनुपस्थित राहील्यास आपले काही एक म्हणणे नाही असे गृहीत धरुन गुणवत्तेनुसार योग्य तो निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. वादी यांनी प्रतिवादी यांना अपिल अर्ज व त्यासोबत जोडलेले कागदपत्र प्रतिवादी यांना उपलब्ध करुन द्यावयाचे आहेत.

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी, पुणे करीता**

**प्रत : उपविभागीय अधिकारी- जुन्नर- आंबेगाव यांचेकडे**
प्रस्तुतच्या अपिलातील आपलेकडील मुळ संचिका सुनावणीपुर्व या कार्यालयास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**अपर जिल्हाधिकारी, पुणे करीता**

# रक्तदान शिबिर व सामाजिक उपक्रमांनी अनिरुद्ध देशपांडे यांचा वाढदिवस साजरा

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड अमनोराचे व्यवस्थापकीय संचालक, अमनोरा येस फाउंडेशनचे अध्यक्ष आणि पुणे जिल्हा व महानगर बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्ष अनिरुद्ध देशपांडे यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त पुणे जिल्हा व महानगर बॅडमिंटन संघटनेतर्फे शिवाजीनगर मधील संघटनेच्या बॅडमिंटन संकुलामध्ये रविवार ५ एप्रिल रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते . शिबिराला अतिशय चांगला प्रतिसाद प्राप्त झाला. आजवर विविध ठिकाणी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरांमधून एकूण ३२५ बाटल्यांचे संकलन करण्यात आले.

असोसिएशनचे सरचिटणीस रणजीत नातू, उपाध्यक्ष अविनाश जाधव, सुशील जाधव, स्पर्धा चिटणीस राजीव बाग, खजिनदार सारंग लागू, सल्लागार अतुल बिनीवाले, गिरीश नातू, अभय



सोनवणे, सिटी ग्रुपचे मुख्य सामाजिक अधिकारी विवेक कुलकर्णी आदी यावेळी उपस्थित होते. असोसिएशनतर्फे रक्तदान शिबिराचे यंदाचे हे दुसरे वर्ष आहे. अनिरुद्ध देशपांडे यांच्या वाढदिवसानिमित्त अमनोरा येस फाउंडेशन तर्फे 25 मार्च ते 5 एप्रिल या दरम्यान विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये हडपसर मधील अमनोरा मध्ये राहणाऱ्या नागरिकांच्या घरांमध्ये काम करणाऱ्या अवंतिकांची, घर कामगारांची आणि हाउसकीपिंग महिला कर्मचाऱ्यांची मिळून सुमारे 250 जणांची ब्रेस्ट कॅन्सर तपासणी करण्यात आली. तसेच 530 जणांची नेत्र तपासणी करून त्यापैकी 260 जणांना चष्मेवाटप, 30 जणांच्या मोतीबिंदू शस्त्रक्रिया आणि 400 जणांच्या सायरोमॅट्रिक तपासण्या करण्यात आल्या. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नर्सिंग कॉलेजमधील 32 विद्यार्थिनींना दहा लाख रुपयांच्या मीरा देशपांडे शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आले, तसेच वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या 18 जणांना परशुराम पुरस्कार प्रदान करण्यात आला. या उपक्रमांमध्ये बीजे मेडिकल कॉलेज, ससून रुग्णालय, रोटरी क्लब ऑफ पुणे कात्रज, एमईएसचे परशुराम रुग्णालय चारिटेबल ट्रस्ट चिपळूण, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटल, सिपला ब्रिद फ्री, जनकल्याण रक्त केंद्र, श्वास फाउंडेशन कोल्हापूर या संस्थांनी योगदान दिले. तसेच बीजे मेडिकल कॉलेजचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार, वैद्यकीय अधीक्षक डॉक्टर यल्लाप्पा जाधव, सर्जरी विभाग प्रमुख डॉ. लता भोईर, एच. व्ही. देसाई आय हॉस्पिटलचे अध्यक्ष डॉ. राजेश शहा, परवेज बिलमोरिया, जितेश खरात, संजय कुलकर्णी, परशुराम मेडिकल हॉस्पिटलचे डॉ. सचिन उत्पात, डॉ. अनुपम अलमान, एमईएस नरसिंग कॉलेजचे प्राचार्य मिलिंद काळे, सिपला ब्रीद फ्रीचे प्रमोद अष्टेकर आदी विविध क्षेत्रातील मान्यवर या सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी झाले होते. रक्तदान शिबिरानिमित्त पुणे जिल्हा व महानगर बॅडमिंटन संघटनेचे सरचिटणीस रणजीत नातू म्हणाले, अनिरुद्ध देशपांडे यांनी गेल्या पंधरा वर्षांपासून बॅडमिंटन संघटनेचे अध्यक्षपद अतिशय यशस्वीरित्या सांभाळले आहे त्यांच्या अध्यक्षतेखाली संघटनेने अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार केले आहेत. त्यांचा या संघटनेला नेहमीच विविध प्रकारे सहकार्य लाभलेले आहे त्यांच्या या योगदानाच्या निमित्ताने संघटनेतर्फे दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते.

सिटी ग्रुपचे मुख्य सामाजिक अधिकारी विवेक कुलकर्णी म्हणाले, अनिरुद्ध देशपांडे यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्याच्या विविध भागांमध्ये शैक्षणिक, वैद्यकीय आदी विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्यांसाठी उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबिर, ब्रेस्ट कॅन्सर तपासणी, नेत्र तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया असे उपक्रम घेण्यात आले. महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या नर्सिंग कॉलेज मधील 32 विद्यार्थिनींना दहा लाख रुपयांची मीरा देशपांडे शिष्यवृत्ती वाटप करण्यात आली. अमनोरा मॉल अमनोरा टाऊनशिप, चिपळूण मधील परशुराम हॉस्पिटल आणि पुणे महानगर बॅडमिंटन संघ या ठिकाणी रक्तदान शिबिर घेण्यात आले. त्यामध्ये सुमारे 325 बाटल्यांचे संकलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

# नारायणगाव पोलीसांकडून गहाळ मोबाईल शोधून नागरिकांना परत

**एकूण ४ लाख रुपये किमतीचे २५ मोबाईल केले परत**

**नारायणगाव (दै. संध्या) :**

नारायणगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नागरिकांचे हरवलेले/ गहाळ झालेले मोबाईल फोन शोधून काढत पोलीसांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. फेब्रुवारी २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत एकूण ४ लाख रुपये किंमतीचे विविध कंपन्यांचे २५ मोबाईल फोन शोधून ते संबंधित मालकांना परत देण्यात आल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक श्री. प्रविण संपांगे यांनी दिली. हरवलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी CEIR पोर्टल तसेच तांत्रिक विश्लेषणाचा वापर



करण्यात आला. ही कार्यवाही पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदिप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी (जुन्नर) धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. नारायणगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक प्रविण संपांगे यांच्या नेतृत्वाखाली पोसई सोमशेखर शेटे व डीबी पथकाचे इन्चार्ज पोसई जगदीश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंगेश लोखंडे, पोलीस शिपाई सोमनाथ डोके, सत्यम केळकर व टिलेश जाधव यांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे मोबाईल शोधून काढले. यापूर्वी देखील जवळपास १० लाख रुपये किंमतीचे ३८ मोबाईल शोधण्यात आले होते. अशा प्रकारे २०२५ ते २०२६ या कालावधीत आजपर्यंत एकूण १३ लाख ९६ हजार रुपये किंमतीचे ६३ मोबाईल शोधून नागरिकांना परत करण्यात आले आहेत. नागरिकांनी हरवलेले मोबाईल त्वरित पोलीस स्टेशनमध्ये नोंदवावेत तसेच CEIR पोर्टलवर माहिती भरावी, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## चिंतामणीच्या दर्शनासाठी भाविकांनी केली गर्दी

**लोणी काळभोर (दै. संध्या) :**

आज चैत्र महिन्यातील संकष्ट चतुर्थी असल्याने भाविकांनी श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटे पासून गर्दी केली होती. पहाटे पुजारी राजेंद्र आगलावे यांच्या हस्ते श्रीं ची पूजा करण्यात आली.



चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगणात मांडव घालण्यात आले होते, दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. उष्णतेमुळे भाविकांची गैरसोय होऊ नये म्हणून कूलर लावण्यात आले होते. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी वाटण्यात आली. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ. प. वासुदेव महाराज गोपाळे खेड राजगुरुनगर यांचे सुभाष्य कीर्तन झाले, चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघाला त्यानंतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था केली होती. ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

## युवा क्रांती पोलीस मित्र संघटनेत पदोन्नती

**कवठे येमाई (दै. संध्या) :**

गेल्या चार वर्षांपासून अन्याय, अत्याचार आणि भ्रष्टाचाराविरुद्ध सातत्याने लढा देत असलेल्या युवा क्रांती पोलीस मित्र, ग्राहक पत्रकार संरक्षण, माहिती अधिकार संघटनेत यंदाच्या वर्षी नवीन पदनियुक्त्या आणि पदोन्नती जाहीर करण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी संघटनेतील कर्तृत्ववान नेतृत्वाला अधिक संधी देण्याच्या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. या पदोन्नतीमध्ये छत्रपती संभाजीनगर चे नानासाहेब बढे यांची राष्ट्रीय किसान विकास मंचच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली असून, त्यांच्या कार्याची दखल घेत ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच, मोशी पुणे येथील डॉ. राजेश्वर हेंद्रे यांना पोलीस मित्र संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षपदी बढती देण्यात आली आहे. त्यांच्या संघटनात्मक कार्यकुशलतेमुळे संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त केला जात आहे.तर मुंबईत संघटनेचे कार्य कुशल नेतृत्व ठरलेले राकेश वाघ यांना ही पदोन्नती देण्यात आली असून त्यांची संघटनेच्या राष्ट्रीय महासचिव तथा मुंबई प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेत कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी ही पदोन्नती जाहीर करण्यात आल्याचे अध्यक्ष रविंद्र सूर्यवंशी यांनी सांगितले.

# रामदास आठवले आज घेणार राज्यसभा सदस्यत्वाची शपथ

**मुंबई (दै. संध्या) :**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झालेली आहे. आज सोमवार दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी संसदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आपल्या तिस-या टर्मच्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेणार आहेत. महाराष्ट्रातुन राज्यसभेवर 7 खासदार बिनविरोध निवडुन गेलेले आहेत. त्यात ना. रामदास आठवले यांचा समावेश आहे. राज्यसभेवर सलग तिस-यांदा बिनविरोध निवड होवून ना. रामदास आठवले यांनी राज्यसभा खासदार म्हणून हॅट्रीक



केलेली आहे. आपल्या राज्यसभेच्या तिसऱ्या टर्मची सुरुवात ना. रामदास आठवले आज दिनांक 6 एप्रिल2026 पासुन करणार आहे. ना. रामदास आठवले यांची एप्रिल 2014 ला सर्वप्रथम राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. त्यानंतर एप्रिल 2020 मध्ये दुस-यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. एप्रिल 2020 ते 2 एप्रिल 2026 पर्यंत त्यांच्या दुस-या टर्मची मुदत होती. उद्या दिनांक 6 एप्रिल 2026 रोजी संसदेत ना. रामदास आठवले आपल्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर दिनांक 6 एप्रिल 2026 पासुन राज्यसभेच्या त्यांच्या तिस-या टर्मला सुरुवात होणार आहे. दिनांक 6 एप्रिल 2026 ते एप्रिल 2032 पर्यंत ना.रामदास आठवले यांची राज्यसभेत तिसरी टर्म राहणार आहे.

तिसऱ्यांदा राज्यसभेत निवड झाल्याबद्दल केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांचे देशभरातील दलित, बहुजनांनी हार्दिक स्वागत आणि अभिनंदन केले आहे. देशभर ना. रामदास आठवले यांचे सत्कार आणि स्वागत होत आहे. नारामदास आठवले यांना तिसऱ्यांदा राज्यसभेवर निवडुन दिल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे राज्यभरातील आंबेडकरी रिपब्लकन जनतेतर्फे हार्दिक आभार मानले जात आहे.



# सम्राट अशोक यांची २३३० वी जयंती संपन्न

**नालासोपारा (दै. संध्या) :**

सम्राट अशोक यांच्या २३३० व्या जयंतीनिमित्त नालासोपारा येथील ऐतिहासिक बौद्ध स्तूप परिसरात आज विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला वसई-विरार महानगरपालिकेचे महापौर अजीव पाटील यांनी उपस्थित राहून अभिवादन केले. व लोकनेते हितेन्द्र ठाकुर व त्याची टीम नेहमीच नेहमीच सहकार्य करते व करत राहील असे आश्वासन दिले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमाप्रसंगी महापौर अजीव पाटील यांनी बौद्ध स्तूपावर पुष्पहार अर्पण करून सम्राट अशोक यांच्या कार्याला अभिवादन केले. त्यांनी आपल्या भाषणात सम्राट अशोक यांनी दिलेल्या अहिंसा, शांती आणि धर्मनिरपेक्षतेच्या संदेशाचे महत्त्व अधोरेखित केले. “आजच्या काळात समाजात शांतता आणि बंधुभाव टिकवण्यासाठी अशोकांच्या विचारांची नितांत गरज आहे,” असे ते म्हणाले. नालासोपारा येथील बौद्ध स्तूप हा प्राचीन इतिहासाचा महत्त्वाचा वारसा मानला जातो. सम्राट अशोक यांच्या काळात बौद्ध धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला होता आणि त्याचेच प्रतीक म्हणून हा स्तूप ओळखला जातो. या ऐतिहासिक स्थळाला भेट देऊन महापौरांनी त्याच्या संवर्धनाबाबतही आपली भूमिका स्पष्ट केली. त्यांनी प्रशासनाच्या वतीने स्तूप परिसराच्या विकासासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले. या कार्यक्रमात स्थानिक नागरिक, बौद्ध बांधव, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी मिळून सम्राट अशोक यांच्या प्रतिमेला अभिवादन करत त्यांच्या विचारांचा प्रचार आणि प्रसार करण्याचा संकल्प केला. तसेच, परिसरात स्वच्छता मोहीम आणि वृक्षारोपण यांसारखे उपक्रमही राबवण्यात आले. या निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आणि स्थानिक कलाकारांनी बौद्ध धर्मावर आधारित गीते, नृत्य आणि नाट्य सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचा शेवट सर्वांनी एकत्र येऊन शांततेचा संदेश देत केला. एकूणच, सम्राट अशोक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या कार्यक्रमाने नालासोपारा परिसरात ऐतिहासिक वारशाची जाणीव आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दृढ केला. महापौर अजीव पाटील यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक उंची मिळाली असून, भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न सुरू राहील, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# मराठी भाषेचे संवर्धन करून तरुणांना साहित्याची गोडी निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणार

## योगेश सोमण, अध्यक्ष, महाराष्ट्र साहित्य परिषद : भारतीय साहित्याचा सांस्कृतिक प्रवाह साहित्य परिषद आणखी विस्तृत करेल - गिरीश प्रभुणे

**'कलारंग'च्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा 'गौरव सोहळा' थाटात संपन्न; १०० वे साहित्य संमेलन पिंपरी चिंचवडमध्ये व्हावे - आमदार अमित गोरखे**



**पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)**

कला, साहित्य आणि संस्कृतीचे संवर्धन करणाऱ्या 'कलारंग' सांस्कृतिक कला संस्थेच्या वतीने महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या निवडणुकीत नवनिर्वाचित ठरलेल्या पदाधिकाऱ्यांचा आणि सहकाऱ्यांचा 'सारस्वतांचा गौरव सोहळा' शुक्रवार ०३ एप्रिल रोजी निगडी येथील ग. दि. माडगूळकर नाट्यगृहात अत्यंत उत्साहात संपन्न झाला. यावेळी महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मा. श्री. योगेशजी सोमण, प्रमुख कार्यवाह मा. स्वातीताई महाळंक आणि कोषाध्यक्ष मा. श्री. प्रदीप निफाडकर यांचा तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीतील सुनील महाजन, सुनेत्रा मंकणी, अंजली कुलकर्णी, प्रसाद मिरासदार, माधव राजगुरु, डॉ. नितीन संगमनेरकर, डॉ. आशुतोष जावडेकर, राजन लाखे, पुरुषोत्तम काळे आणि प्रभाकर ओव्हाळ यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पद्मश्री, ज्येष्ठ समाजसेवक मा. श्री. गिरीशजी प्रभुणे तसेच उपस्थित सर्व मान्यवर यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून झाली. या सोहळ्याला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक व साहित्य वैभवात भर टाकणारी महत्त्वाची अपेक्षा व्यक्त केली. आगामी १०० वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे पिंपरी-चिंचवड शहरात व्हावे, अशी इच्छा त्यांनी यावेळी बोलून दाखवली. शहराची क्षमता आणि येथील साहित्यप्रेमींचा उत्साह लक्षात घेता, हे ऐतिहासिक संमेलन आयोजित करण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी नमूद केले.आमदार अमित गोरखे म्हणाले की, साहित्यिक हे समाजाला दिशा देण्याचे काम करतात. अशा विद्वान व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणे हे आमचे भाग्य असून, पिंपरी-चिंचवड शहराच्या साहित्य व सांस्कृतिक चळवळीला यामुळे नवी ऊर्जा मिळेल.

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष योगेश सोमण यांनी आपल्या भाषणात संस्थेच्या समृद्ध वारशाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले की, ११९ वर्षांची सांस्कृतिक परंपरा असलेल्या या संस्थेच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळताना एक प्रकारचे दडपण आहे, जे मी नाकारणार नाही. आज माझ्यावर सोपवण्यात आलेली ही जबाबदारी मी अतिशय नम्रपणे स्वीकारत आहे. ही वाटचाल मला अधिक सक्षम आणि तितक्याच सावधपणे करायची आहे. ज्यावेळी मी १ तारखेला या पदाचा कार्यभार स्वीकारला आणि खुर्चीवर बसलो, त्याच क्षणी मला या कर्तव्याची खऱ्या अर्थाने जाणीव झाली. ही केवळ फिरणारी एक साधी खुर्ची नाही, तर १६,९०० हून अधिक सदस्यांच्या नजरा या खुर्चीकडे आशेने लागलेल्या आहेत. त्या प्रत्येक सदस्याला आपण उत्तरदायी आहोत. येत्या पाच वर्षांत आपण जी दिशा ठरवणार आहोत आणि ज्या पद्धतीने काम करणार आहोत, त्यात या सर्वांचा सहभाग कसा राहील, हे पाहणे ही माझी प्राथमिक जबाबदारी असेल. हे पद म्हणजे कोणत्याही एका व्यक्तीच्या विचारशक्तीचे किंवा कल्पनेचे फळ नाही; तर हे अनेकांच्या इच्छाशक्तीचे, अफाट परिश्रमांचे आणि सामुहिक कष्टांचे प्रतीक आहे. या कार्यकारिणीचा प्रत्येक निर्णय हा सर्वसमावेशक असेल, याची मला संपूर्ण जाणीव आहे आणि हे कर्तव्य पार पाडण्यासाठी मी पूर्णतः कटिबद्ध आहे. पुढील काळात भाषेचे संवर्धन आणि साहित्याची गोडी जनमानसात निर्माण करण्यासाठी आम्ही एक वर्षाचे सूक्ष्म नियोजन करणार आहोत. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने दोन महत्त्वाच्या गोष्टी समोर आल्या, ज्याची नोंद घेणे आवश्यक वाटते. पहिले म्हणजे, आजवरच्या ९९ संमेलन अध्यक्षांपैकी २५ अध्यक्ष हे फर्ग्युसन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी राहिले आहेत, ही अभिमानास्पद बाब आहे. मात्र, दुसरीकडे एक गोष्ट मनाला खटकली, ती म्हणजे या ९९ अध्यक्षांमध्ये महिला अध्यक्षांची संख्या केवळ ७ आहे. ही दरी नक्कीच विचार करायला लावणारी आहे.

मराठी भाषेचे संवर्धन आणि साहित्याची गोडी जनसामान्यात निर्माण करणे, हे आमचं मुख्य उद्दिष्ट असेल. शंभराव्या साहित्य संमेलनानंतर अनेक गोष्टी घडतीलच, पण मला 'शाश्वत कामावर' भर द्यायचा आहे. साहित्याची ही पालखी उद्या तरुणांच्याच खांद्यावर जाणार आहे. आजचे जे ३०-३५ वयोगटातील तरुण आहेत, जे काही कारणास्तव मराठी साहित्यापासून थोडे दुरावले आहेत, त्यांना पुन्हा वाचनाकडे वळवणे आणि त्यांच्या मनात मराठी भाषेबद्दलची गोडी निर्माण करणे, हे प्राधान्य असेल. यासाठी 'अभिवाचन' सारख्या कार्यशाळा सुरू करण्याचा आमचा मानस आहे. तरुणांच्या माध्यमातूनच मराठी भाषेचा हा वारसा आपण सक्षमपणे पुढे नेऊ शकतो. साहित्य परिषद ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी महिनाभरात कामाची ठोस दिशा निश्चित केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### साहित्यातून भारतीय अस्मितेचा जागर व्हावा - गिरीश प्रभुणे

यावेळी बोलताना प्रमुख पाहुणे गिरीश प्रभुणे यांनी आपल्या ओघवत्या शैलीत नवनिर्वाचित कार्यकारिणीला मार्गदर्शन केले. परिषदेचे वातावरण आता शुद्ध झाले असून, नीट काम करायचे ठरवले तर पाच वर्षांचा काळही अपुरा पडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. पूर्वी केवळ 'वैचारिक अड्डा' बनलेल्या या ठिकाणी आता साहित्यिक उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीयत्वाच्या मूळ अस्मितेशी आणि स्वभावाशी जुळणारा प्रवाह आता सुरू झाला असून, ज्याप्रमाणे ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ आणि चोखोबा या संतांनी एकत्रितपणे अभंग-ओव्यांच्या माध्यमातून जनसामान्यांचे विचार मांडले, तोच विचार पुढे नेण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

### सांस्कृतिक मेजवानी

'कलारंग' संस्थेचे अध्यक्ष आमदार अमित गोरखे, उपाध्यक्ष शैलेश लेले, सदस्य आशा नेगी आणि संजना मगर, राम गायकवाड,प्रवीण पोळ,मुकुंद वेदपाठक यांच्या नियोजनाखाली हा सोहळा पार पडला. कार्यक्रमाचे निवेदन रविंद्र खरे यांनी केले. यावेळी संयोजन समितीचे सदस्य आणि मोठ्या संख्येने रसिक प्रेक्षक उपस्थित होते. कला आणि साहित्याचा हा अनोखा त्रिवेणी संगम अनुभवताना उपस्थित नागरिक भारावून गेले होते. संयोगिता खुडे यांनी पसायदान म्हणून कार्यक्रमाची सांगता केली.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात 5 नव्या पोलिस ठाण्यांना मान्यता

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या, नागरी विस्तार आणि गुन्हेगारीवर अधिक प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत पाच नव्या पोलिस ठाण्यांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे आयुक्तालयातील एकूण पोलिस ठाण्यांची संख्या २३ वरून २८ पर्यंत वाढणार आहे. पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी पिरंगुट, जांबे, पिंपळे सौदागर, मोशी आणि देहूरोड या भागांमध्ये स्वतंत्र पोलिस ठाणे स्थापन करण्याचा प्रस्ताव पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवला आहे. या प्रस्तावाला मान्यता मिळाल्यानंतर संबंधित भागातील कायदा-सुव्यवस्था अधिक सक्षमपणे हाताळणे शक्य होणार आहे. या नव्या पोलिस ठाण्यांसाठी मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाचीही निर्मिती होणार आहे. परिमंडळ ४ साठी ११ पदे, पिरंगुट पोलिस ठाण्यासाठी १९०, जांबे पोलिस ठाण्यासाठी १८९, पिंपळे सौदागर पोलिस ठाण्यासाठी १८३, मोशी पोलिस ठाण्यासाठी १९४ आणि देहुगाव पोलिस ठाण्यासाठी १९४ अशी एकूण ९६१ नवीन पदे निर्माण करण्यात येणार आहेत. या निर्णयामुळे नागरिकांना अधिक जलद पोलीस सेवा मिळणार असून, वाढत्या शहरात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे. तसेच, स्थानिक पातळीवर गुन्हे नियंत्रण आणि तातडीच्या प्रतिसादातही मोठी सुधारणा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### मोशीत संतापजनक घटना : सात वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचार, आरोपीला अटक

पिंपरी (दैनिक संध्या) : मोशी परिसरातून मानवतेला काळीमा फासणारी धक्कादायक घटना समोर आली आहे. विनायकनगर येथील शिवशंभो कॉलनीमध्ये एका ४० वर्षीय इसमाने सात वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. रामू कुंजल निसाद (वय ४०) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, २ एप्रिल रोजी सायंकाळी आरोपीने पीडित मुलीला आपल्या खोलीत बोलावून तिच्यावर अत्याचार केला. तसेच, ही बाब कुणालाही सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. यानंतर ३ एप्रिल रोजी सकाळी आरोपीने पुन्हा अत्याचाराचा प्रयत्न केला. मात्र, यावेळी पीडित मुलीची आई व आत्या यांनी खिडकीतून हा प्रकार पाहिला. त्यांनी तात्काळ एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पीडितेच्या आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ६४ (१), ६५ (२), ७४, ३५१ तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक (POCSO) कायद्यानुसार कलम ४, ६, ८ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची नागरिकांकडून मागणी होत आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### पवना धरणात 46.55% पाणीसाठा; पिंपरी-चिंचवडला पावसाळ्यापर्यंत पुरेसा

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात शनिवारी (दि.4) सकाळी आठपर्यंत 46.55 टक्के पाणीसाठा शिल्लक होता. तीव उन्हामुळे तसेच, पाण्याची मागणी वाढल्याने पाण्याचा साठा वेगात कमी होत आहे. हा साठा पिंपरी-चिंचवड शहराला पावसाळ्यापर्यंत म्हणजे जून महिन्यापर्यंत पुरेल इतका आहे. मावळ तालुक्यातील पवनानगर येथील पवना धरणातून पिंपरी-चिंचवड शहराला पाणीपुरवठा केला जातो. महापालिकेकडून पवना नदीवरील रावेत येथील बंधाऱ्यातून दररोज 520 एमएलडी पाणी उचलले जाते. पाण्यावर प्रक्रिया करून पिण्यायोग्य पाणी संपूर्ण शहराला पुरवले जाते. एमआयडीसीकडून 30 एमएलडी पाणी घेऊन शहरातील काही भागास पुरवले जात आहे. आंद्रा धरण पाणी योजनेअंतर्गत निघोजे येथील इंद्रायणी नदी बंधाऱ्यातून दररोज 80 ते 90 एमएलडी पाणी उचलून चिलखी जलशुद्धीकरण केंद्रात शुद्ध करून त्या परिसरात पुरवले जात आहे. गेल्या सव्वासहा वर्षांपासून दोन दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत आहे. तीव उन्हामुळे पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे.

---

## आळंदीतील दुहेरी हत्याकांडाचा छडा; आरोपीला काही तासांत पोलिसांकडून अटक

**पिंपरी (दै. संध्या)**

आळंदी परिसरात गुरुवारी उघडकीस आलेल्या सहा वर्षीय चिमुकली आणि ७० वर्षीय वृद्ध महिलेच्या दुहेरी हत्याकांडाचा पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेने अवघ्या काही तासांत छडा लावला आहे. या प्रकरणी विनायक तुकाराम भवारी (वय ३१) या आरोपीला आळेफाटा येथून अटक करण्यात आली आहे.

मृतांमध्ये धनश्री केदारी (वय ६) आणि शेजारी राहणाऱ्या मंगल शिंदे (वय ७०) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, धनश्रीची आई संगीता केदारी या गुरुवारी रात्री कामानिमित्त हॉस्पिटलमध्ये गेल्या होत्या. त्यामुळे धनश्री शेजारील मंगल शिंदे यांच्याकडे थांबली होती. रात्री उशिरा आरोपी विनायक भवारी तेथे आला. पत्नीला आपल्या विरोधात भडकवले जात असल्याच्या संशयातून संतापलेल्या आरोपीने प्रथम मंगल शिंदे यांचे डोके भिंतीवर आपटून त्यांची हत्या केली. त्यानंतर ओळख पटेल या भीतीने त्याने चिमुकल्या धनश्रीचा उशीने तोंड दाबून खून केला. घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखा युनिट ३ चे पोलीस निरीक्षक कसबे आणि उपनिरीक्षक भरत गोसावी यांच्या पथकाने तातडीने तपास सुरू केला. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा माग काढण्यात आला. तो आळेफाटा येथे पळून गेल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला अटक केली. दरम्यान, संगीता केदारी आणि आरोपी विनायक भवारी यांचा दोन वर्षांपूर्वी फेसबुकच्या माध्यमातून परिचय होऊन प्रेमविवाह झाला होता. मात्र, गेल्या काही काळापासून दोघांमध्ये वाद सुरू असल्याने आरोपी वेगळा राहत होता. या वादातूनच त्याने हे भीषण कृत्य केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या दुहेरी हत्याकांडामुळे आळंदी परिसरात एकच खळबळ उडाली असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

---

## ऑनलाईन मालमत्ता कर भरण्यास नागरिकांची मोठी पसंती

**पिंपरी (दै. संध्या)**

■ ६९७ कोटींचा ऑनलाईन भरणा




पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागाच्या सुलभ, तंत्रज्ञानाधारित उपक्रमांना नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मालमत्ता कर भरण्यासाठी ऑनलाईन माध्यमाला मोठी पसंती मिळत असल्याची माहिती उपायुक्त सचिन पवार यांनी यावेळी दिली. गेल्या आर्थिक वर्षात, १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत एकूण ७ लाख ८७ हजार १८४ मालमत्ताधारकांपैकी ६ लाख ३१ हजार ६१५ मालमत्ताधारकांनी ९६१.७४ कोटी रुपयांचा मालमत्ता कर भरला आहे. यापैकी ५ लाख ११ हजार ६०३ मालमत्ताधारकांनी तब्बल ६९७.१९ कोटी रुपयांचा कर ऑनलाईन माध्यमातून भरत डिजिटल सुविधेचा वापर केला. महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली 'ऑनलाईन कर भरा' मोहिमेअंतर्गत सवलती, एसएमएस सूचना, सोशल मीडिया मोहिमा तसेच सार्वजनिक घोषणांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. या प्रयत्नांचा सकारात्मक परिणाम म्हणून नागरिकांनी प्रत्यक्ष कार्यालयात जाण्याऐवजी घरबसल्या ऑनलाईन कर भरण्यास प्राधान्य दिले आहे. महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर नागरिकांना मालमत्तेची माहिती, थकबाकी, सवलतींचा तपशील तसेच कर भरण्याची पावती डाउनलोड करण्याची सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिक डिजिटल साधनांचा प्रभावी वापर करत असून, ऑनलाईन पेमेंट प्रणालीमुळे कर भरणे अधिक सुलभ झाले आहे.

### कर भरणा

- ऑनलाईन : ६९७.१९ कोटी (७२.४९%)
- चेक : ११९.१३ कोटी (१२.३९%)
- रोख : १०४.८७ कोटी (१०.९०%)
- डीडी : ७.०९ कोटी (०.७४%)
- समायोजन : ३३.३८ कोटी (३.४७ %)


पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने कर भरणा प्रक्रियेत सुलभता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना प्राधान्य दिले आहे. नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन माध्यमाचा स्वीकार केल्यामुळे घरबसल्या अधिक जलद पद्धतीने कर भरण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने वेळ व श्रमांची बचत होत आहे. **– सचिन पवार, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

---

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणाचा जाहीर निषेध

### आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची आमदार महेश लांडगेंची मागणी

**पिंपरी (दै. संध्या)**



मोशी परिसरात घडलेली अत्यंत संतापजनक आणि मन हेलावून टाकणारी घटना संपूर्ण समाजाला हादरवणारी आहे. अवघ्या सात वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर रामू कुंजल निसाद (वय ४०) या नराधमाने केलेला अमानुष लैंगिक अत्याचार हा केवळ एक गुन्हा नसून, माणुसकीला काळिमा फासणारा आणि समाजव्यवस्थेला गंभीर प्रश्न विचारणारा प्रकार आहे. अशा विकृत प्रवृत्तीच्या गुन्हेगारांना समाजात कोणतेही स्थान नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पीडितेला तात्काळ व योग्य न्याय मिळावा, तसेच आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करून त्याला कडक शिक्षा व्हावी, अशी ठाम मागणी केली आहे. या संदर्भात आमदार महेश लांडगे, नगरसेवक निखिल बोऱ्हाडे यांनी मारुती जगताप, पोलीस उपायुक्त (परिमंडल ३, पिंपरी-चिंचवड) तसेच गणेश जमादार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, MIDC भोसरी पोलीस स्टेशन यांची भेट घेतली. यावेळी त्यांनी घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली असून, तपासात कोणतीही दिरंगाई न करता आरोपीवर तातडीने आणि कडक कारवाई करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली असून, आरोपीला कठोर शिक्षा व्हावी, अशी सर्व स्तरांतून मागणी होत आहे. पोलीस प्रशासनानेही या प्रकरणाचा तपास गांभीर्याने सुरू केला असून, दोषीवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन देण्यात आले आहे.

---

## CSPC सायकल संघ पिंपरी-चिंचवडचा शुभारंभ

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील सायकलिंगप्रेमी, सायकलपटू आणि स्वयंसेवकांनी एकत्र येत CSPC – सायकल संघ पिंपरी-चिंचवड या नव्या संघटनेची स्थापना १ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आली. पर्यावरण संवर्धन आणि नागरिकांच्या आरोग्याबाबत जनजागृती करणे हा या संघटनेचा मुख्य उद्देश असून, विशेषतः तरुण पिढीसह सर्व वयोगटांमध्ये सायकलिंगचे महत्त्व रुजवण्याचा संकल्प यामागे आहे. संघटनेचा अधिकृत शुभारंभ, लोगो अनावरण आणि जर्सी प्रदर्शनाचा कार्यक्रम प्राधिकरण येथील स्वातंत्रवीर सावरकर सदनमधील कॅप्टन कदम सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमाला Indo Athletics Society (IAS) चे संस्थापक अध्यक्ष आणि सॉफ्टवेअर अभियंता गजानन शिवाजीराव खैरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते लोगो व जर्सीचे अनावरण करण्यात आले. यावेळी बोलताना खैरे यांनी CSPC संघटनेला शुभेच्छा देत सायकलिंगच्या माध्यमातून आरोग्य आणि पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच उपस्थित सायकलपटूंना मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. कार्यक्रमाला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा कार्यवाह नरेंद्र विश्वनाथ पेंडसे यांचीही उपस्थिती होती.

---

## पिंपरी-चिंचवड भाजप युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळखपत्रांचे वितरण

**पिंपरी (दै. संध्या)**




पिंपरी-चिंचवड शहरात भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने एक महत्त्वपूर्ण आणि अभिनव उपक्रम राबवण्यात आला. शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या संकल्पनेतून युवा मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळखपत्रांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे संघटनात्मक बळकटीसह कार्यपद्धतीत शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण होणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

या कार्यक्रमाचे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले होते. शहरातील विविध प्रभाग, मंडळे आणि विभागांमध्ये कार्यरत असलेल्या पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळखपत्रे देण्यात आली. या ओळखपत्रांवर पदाधिकाऱ्यांचे नाव, पद, संपर्क माहिती तसेच संघटनेची स्पष्ट ओळख नमूद करण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांशी संवाद साधताना आणि सामाजिक, शैक्षणिक तसेच जनहिताच्या उपक्रमांमध्ये सहभागी होताना पदाधिकाऱ्यांना अधिकृत ओळख मिळणार आहे. शहराध्यक्ष दिनेश यादव यांनी यावेळी बोलताना सांगितले की, "भारतीय जनता युवा मोर्चा हा पक्षाचा ऊर्जावान आणि गतिमान घटक आहे. प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून प्रामाणिकपणे कार्य करणे आवश्यक आहे. ओळखपत्र ही केवळ औपचारिकता नसून ती संघटनेची शिस्त आणि जबाबदारी अधोरेखित करणारे साधन आहे. यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास वाढेल आणि नागरिकांमध्ये विश्वास निर्माण होईल." कार्यक्रमाला विविध पदाधिकारी, विभाग प्रमुख, मंडळ अध्यक्ष तसेच युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे स्वागत करत शहराध्यक्षांच्या संकल्पनेचे कौतुक केले. काही पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, या ओळखपत्रांमुळे त्यांना अधिक जबाबदारीची जाणीव होईल आणि संघटनेच्या कार्यात अधिक प्रभावीपणे सहभाग घेता येईल.

या उपक्रमामुळे युवा मोर्चाच्या कामकाजाला नवी दिशा मिळणार असून संघटन अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे. भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांद्वारे युवकांना संघटनेशी जोडून समाजकार्यात सक्रिय सहभाग वाढवण्याचा मानस व्यक्त करण्यात आला. यावेळी सरचिटणीस मधुकर बच्चे, प्रदेश सचिव अजित कुलथे, सरचिटणीस दिनेश काटे, प्रसाद कस्पटे, साची दोषी, सन्मक साबळे, राहुल खाडे, सुमित घाटे, गणेश सस्ते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### जानाई देवी यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी मंगेश घोणे तर उपाध्यक्षपदी सुरेश उबाळे





जेजुरी (दैनिक संध्या) : महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदैवता जानाई देवीची दीडशे वर्षानंतर पहिल्यांदाच यात्रा भरत असून या यात्रा कमिटीच्या अध्यक्षपदी जेजुरी देवसंस्थानचे प्रमुख विश्वस्त मंगेश घोणे तर उपाध्यक्षपदी जिसा संघटनेचे संस्थापक सुरेश उबाळे यांची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात. मात्र गावची यात्रा दीडशे वर्षापासून भरत नसल्याची खंत ग्रामस्थांच्यात होती.जेजुरी ग्रामदैवत सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्ट आणि खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाने पुढाकार घेवून जेजुरीत दीडशे वर्षांनी देवीची यात्रा भरविण्याचा निर्णय घेतला. दिनांक 10 ते 12 एप्रिल दरम्यान ग्रामदेवता जानाई देवीची यात्रा भरत असून या यात्रेच्या नियोजनासाठी यात्रा कमिटीची निवड करण्यात आली आहे. अध्यक्ष मंगेश घोणे,उपाध्यक्ष सुरेश उबाळे,कार्याध्यक्ष नारायण जाधव,उत्सव प्रमुख संजय शेवाळे,सचिव दिलीप आगलावे,पदाधिकारी ओंकार जाधव,सुयोग राऊत,प्रकाश भापकर,तुषार दरेकर,प्रशांत खोमणे,मयूर माळवदकर. यात्रा कमिटी निवड बैठकी वेळी जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर गोडसे,पदाधिकारी गणेश आगलावे,संतोष खोमणे, छबण कुदळे,राजेंद्र पेशवे,तसेच खंडोबा पालखी सोहळा खांदेकरी मानकरी ग्रामस्थ ट्रस्टचे अध्यक्ष जालिंदर खोमणे,कृष्णा कुदळे,रामदास माळवदकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.



### अध्यक्षपदी डुकरे तर उपाध्यक्षपदी विश्वे

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील पारगाव तर्फे आळे येथील विकास सोसायटीच्या माजी अध्यक्ष नितीन चव्हाण व उपाध्यक्ष विलास चव्हाण यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागांवर कैलास डुकरे यांची अध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी हरिश्चंद्र विश्वे यांची निवडणूक निर्णय अधिकारी संतोष भुजबळ यांच्या उपस्थितीत बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडणुकीच्या कार्यक्रमासाठी पारगाव गावातील विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा सत्कार जुन्नर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती संजय काळे, पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक पांडुरंग गाडगे, गोपालकृष्ण पतसंस्थेचे चेअरमन प्रकाश चव्हाण, उपसरपंच पप्पू डुकरे, माजी उपसरपंच शिवाजीराव डुकरे,सरपंच दत्ता म्हस्के, तंटामुक्ती अध्यक्ष बाबाजी डुकरे, सचिव किरण डुकरे यांच्या हस्ते करण्यात आला.




### उतळे व कोळेकर यांना 'कृष्णराव मुंढे भूषण' पुरस्काराने सन्मानित

नारायणगाव (दैनिक संध्या) : आदिवासी शिक्षण संस्था जुन्नर आयोजित संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी आमदार कै. कृष्णराव मुंढे यांच्या 91 व्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते रघुनाथ उतळे व यूपीएससी परीक्षेत यश मिळवलेल्या अश्विनी अरुण कोळेकर यांना कृष्णराव मुंढे भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अशी माहिती सचिव देवराम मुंढे यांनी दिली. यावेळी माजी आमदार बाळासाहेब दांगट,संस्थेच्या अध्यक्षा सुरेखा मुंढे,सचिव देवराम मुंढे,पंचायत समिती सभापती कमल शेळकंदे,उपसभापती अमित ढोले,माजी नगरसेवक मधुकर काजळे,डीसेंट फाउंडेशनचे अध्यक्ष जितेंद्र बिडवई,नायब तहसीलदार सचिन मुंढे, ॲड.निवृत्ती घोडके,नगरसेवक मंदार बुट्टे पाटील, नगरसेविका राजश्री खोंड आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक देवराम पोटकुले, प्रदीप जुगदर, विनायक पानसरे, कविता साबळे,शितल वाघ,सचिन डेरे यांनी केले.



### जिल्हा बँकेच्यावतीने शेतकऱ्यांना क्रेडिट कार्ड वाटप

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर येथील मार्केट कमिटी शाखेत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने काले विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या सभासद शेतकऱ्यांना जिल्हा बँकेचे संचालक ॲड. संजय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली समन्वय अधिकारी सुभाष कवडे व तालुका विभागीय अधिकारी बाळासाहेब मुरादे यांच्या हस्ते किसान क्रेडिट कार्ड व खरीप हंगामातील पीक कर्ज वाटपाचा शुभारंभ करण्यात आला. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून तालुक्यातील 20 शाखा व 76विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांद्वारे शेतकऱ्यांना पीक कर्ज उपलब्ध करून दिले जाते. गतवर्षी खरीप हंगामासाठी 370 कोटी 31 लाख 45 हजार रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले होते. त्यापैकी मार्च अखेर 328 कोटी 24 लाख 70 हजार रुपयांची वसुली करण्यात आली आहे. या कार्यक्रमास समन्वय अधिकारी सुभाष कवडे,विभागीय अधिकारी बाळासाहेब मुरादे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश ताजने,विकास अधिकारी अनघा सोनवणे, वसंत ताजने शाखा अधिकारी शितल गाडेकर, पुनम बुट्टे पाटील,काले सोसायटीचे अध्यक्ष नवनाथ पानसरे, उपाध्यक्ष सुनील पानसरे, संचालक मिननाथ पानसरे, चंद्रकांत घोगरे,पुष्पलता पानसरे,संतोष कुमकर, मनोहर पानसरे सचिव प्रसन्ना वाजे तसेच सभासद शेतकरी व बँक कर्मचारी उपस्थित होते.

### श्री सद्गुरू सेवा मंडळातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

जुन्नर (दैनिक संध्या) : अलदरे ता. जुन्नर येथे श्री सद्गुरू सेवा मंडळातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शनिवार ता. 4 रोजी शिबिर संपन्न झाले. स्थानिक ग्रामस्थ स्वप्नील दप्तरे आणि श्री सद्गुरू सेवा मंडळाच्या सदस्यांनी या सामाजिक उपक्रमासाठी पुढाकार घेतला. यावेळी अनुभवी नेत्रतज्ज्ञांमार्फत डोळ्यांची सखोल तपासणी करण्यात आली. यावेळी मोतीबिंदू असलेल्या नऊ रुग्णांना मोफत शस्त्रक्रियेसाठी पाठविण्यात आले. तर गरजू रुग्णांना सवलतीच्या दरात चष्म्यांचे वाटप करण्यात आले असल्याचे आयोजक स्वप्नील दप्तरे यांनी सांगितले.

# प्रशासनाच्या दिरंगाईमुळे बेलसरच्या शिवकालीन स्मारकाचे काम रखडले

## ऐतिहासिक ठेव्याच्या जतनासाठी तातडीने कार्यवाही करण्याची ग्रामस्थांची मागणी

नाझरे सुपे (दै. संध्या)

हिंदवी स्वराज्याच्या इतिहासातील पहिली बेलसर लढाई (दि. 11 मे शके १५७० / इ. स. ) येथे झाली असून या लढाईशी संबंधित शिवकालीन घुमटेश्वर समाधी मंदिर क्रमांक १ व २, त्यावरील शिलालेख, समाधी चौथरा तसेच इतर ऐतिहासिक स्मृतीस्थळे सध्या जीर्ण अवस्थेत असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. या ऐतिहासिक वारशाचे जतन, संवर्धन आणि संरक्षण व्हावे, अशी मागणी बेलसर ग्रामस्थ व शिवप्रेमींकडून होत आहे.



या संदर्भात शासन निर्णयानुसार आवश्यक बाबींची पूर्तता करण्यासाठी पुरंदरचे तहसीलदार विक्रम राजपूत यांना निवेदन देण्यात आले होते. त्यानुसार तहसीलदारांनी बैठक आयोजित करून संबंधित स्थळ राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्यासाठी पुणे बांधकाम विभागाशी पत्रव्यवहार केला होता. मात्र अद्याप बांधकाम विभागाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. स्वराज्याच्या या ऐतिहासिक ठेव्याचे स्मारक उभारण्यासाठी प्लॅन, इस्टिमेट आणि स्मारकाचा आराखडा तातडीने पूर्ण करून शासनाने आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे. तसेच जिल्हा परिषद पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करणे अपेक्षित असताना अद्याप कोणत्याही अधिकाऱ्याने स्थळाला भेट दिलेली नाही, अशी खंतही व्यक्त केली जात आहे. सरदार खंडोजी पाटील यांचे बारावे वारसदार विजय पाटील यांनी प्रशासनाच्या कामकाजाबद्दल नाराजी व्यक्त केली. ऐतिहासिक ठेव्याचे जतन करणे ही प्रशासनाची जबाबदारी असताना केवळ वेळकाढूपणा केला जात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रशासनाने तातडीने या कामाची दखल घेऊन स्मारक उभारणीचे काम मार्गी लावावे, अशी मागणी त्यांनी केली.

बेलसर ग्रामस्थ, इतिहास अभ्यासक आणि शिवप्रेमी यांची एकमुखी मागणी असून हिंदवी स्वराज्याच्या इतिहासाशी संबंधित या स्थळाचे जतन करण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**ऐतिहासिक वारसा जपणे ही प्रशासनाची जबाबदारी**

"बेलसर येथील स्वराज्यकालीन ऐतिहासिक स्थळांचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करून स्मारक उभारणीचे काम सुरू करावे."

— विजय पाटील (सरदार खंडोजी पाटील यांचे वारसदार)

## LLB CET परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख

### दोषींवर कारवाईची आमदार राहुल कुल यांची मागणी

यवत (दै. संध्या)

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे (CET Cell) घेण्यात आलेल्या LLB-3 Year CET परीक्षेत छत्रपती शिवाजी महाराज यांचा अनादरपूर्वक एकेरी उल्लेख केल्याचा प्रकार समोर आल्याने संताप व्यक्त होत आहे. या प्रकरणी संबंधित दोषींवर तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी दौंडचे आमदार ॲड. राहुल कुल यांनी पत्राद्वारे केली आहे. २ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या ऑनलाइन परीक्षेतील सामान्य ज्ञान विभागात "शिवाजीच्या मंत्रीमंडळाचे नाव काय होते?" असा प्रश्न विचारण्यात आला होता. महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांचा अशा प्रकारे एकेरी उल्लेख केल्यामुळे विद्यार्थ्यांसह शिवप्रेमींच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. परीक्षार्थींनी या संदर्भात आमदार राहुल कुल यांच्याकडे निवेदन देऊन निषेध नोंदवला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार कुल यांनी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या आयुक्तांना पाठविलेल्या पत्रात काही महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या समिती व संबंधित अधिकाऱ्यांवर तातडीने कठोर प्रशासकीय कारवाई करावी, CET सेलने या चुकीबद्दल सार्वजनिकरीत्या माफीनामा जाहीर करावा, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी स्पष्ट नियमावली तयार करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. यापुढे सर्व शैक्षणिक साहित्य व प्रश्नपत्रिकांमध्ये 'छत्रपती शिवाजी महाराज' असा पूर्ण व आदरयुक्त उल्लेख करणे अनिवार्य करावे, असेही त्यांनी नमूद केले. महापुरुषांचा अवमान कोणत्याही स्तरावर सहन केला जाणार नाही, असे स्पष्ट करत शैक्षणिक संस्था व परीक्षा मंडळांनी अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे आमदार राहुल कुल यांनी अधोरेखित केले. या प्रकरणी राज्य सरकारने तातडीने हस्तक्षेप करून योग्य ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## लोणी काळभोरच्या आखाड्यात दिग्गज मल्लांची उपस्थिती



महाराष्ट्र केसरी राहुल काळभोर यांच्या मार्गदर्शनाखाली या आखाडयात लोणी काळभोर व कदमवाकवस्ती येथील अनेक नेतेमंडळी उपस्थित होती. यावेळी राजकारणातील कट्टर विरोधक सुद्धा एकमेकांना टोपन नाव घेऊन हाका मारत होते .त्यामुळे खरोखरच कुस्तीने गावच्या पुढाऱ्यांना एकत्र केले असुन राजकारण राजकारणाच्या जागी करुन गावातील प्रश्न सर्वांनी एकत्र येऊन असेच मार्गी लावावेत .यात सर्वात सतत उद्भवणारा महत्त्वाचा असा कचरा प्रश्न दोन्ही गावातील सर्व नेतेमंडळींनी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन सोडवावा अशी चर्चा कुस्ती शौकिनांमध्ये चालली होती.

लोणी काळभोर (दै. संध्या)

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील ग्रामदैवत श्रीमंत अंबरनाथाची वार्षिक यात्रा साजरी झाली. आखाड्यात महाराष्ट्र राज्यातील नामवंत मल्ल उपस्थित होते. यंदा प्रथमच सर्वात मोठी व शेवटची २ लाख २१ हजार रुपये इनामाची कुस्ती महाराष्ट्र केसरी पै सिकंदर शेख व महाराष्ट्र केसरी पै पृथ्वीराज मोहोळ यांची कुस्ती बरोबरीत सुटली. अनेक महाराष्ट्र केसरी, अर्जुन पुरस्कार विजेते, उपमहाराष्ट्र केसरी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते अशा पैलवानांची उपस्थिती तसेच ३० लाख रुपयांची रोख बक्षिसे, नवीन आखाड्यातील सुरेख बैठक व्यवस्था व ३ डिजिटल स्क्रीनची सोय, हजारो कुस्तीप्रेमी प्रेक्षकांची उपस्थितीमुळे रात्री सव्वा दहा पर्यंत चाललेला निकाली आखाडा हे लोणी काळभोर येथील श्रीमंत अंबरनाथ यात्रेचे वैशिष्ट्य ठरले.

दुपारी गावकरी वाजत गाजत मिरवणुकीने आखाड्यात आल्यानंतर कुस्ती आखाड्याला सुरुवात झाली. सुरुवातीला छोट्या छोट्या कुस्त्या लावल्या. त्यानंतर निकाली ६१ कुस्त्यांना सुरुवात करण्यात आली. दुसरी २ लाख रुपयांची कुस्ती दीपक हुडा व हिंदकेसरी विक्रांत कुमार यांच्यात झाली. या कुस्तीत विक्रांत कुमारने पोकळ घिस्सा डावावर दीपक हुडाला पराभूत केले. दीड लाख रुपयांच्या तिसऱ्या क्रमांकावरील कुस्तीमध्ये महाराष्ट्र केसरी शिवराज राक्षेने हरियाणाचा जसपाल सिंगला लपेट डावावर अस्मान दाखवले. दीड लाख रुपयांच्या चौथ्या क्रमांकावरील कुस्तीत कोल्हापूरच्या गंगावेस तालमीचा पै जयदीप पाटीलने सैन्यदलाच्या अमित कुमारला पराभूत केले.

कुस्त्यांच्या या जंगी आखाड्यात निकाली कुस्त्यांसाठी उपस्थित प्रेक्षकांचे व गावचे मिळून एकूण सुमारे रोख ३० लाख रुपये विजेत्या मल्लांना बक्षिस म्हणून दिले. दोन कोटी रुपये खर्चुन बांधलेल्या नवीन आखाड्यात प्रेक्षकांना कुस्ती व्यवस्थित दिसावी म्हणून ३ डिजिटल स्क्रीनची सोय केली होती.

२००१ सालचे महाराष्ट्र केसरी पै राहुल काळभोर व त्यांचे सहकारी, काळभैरवनाथ अंबरनाथ देवस्थान ट्रस्ट, गावकरी यांनी केलेल्या उत्कृष्ट नियोजनामुळे प्रेक्षकांना चांगल्या कुस्त्या बघण्याचा आनंद मिळाला. ४ वाजता सुरु झालेला आखाडा रात्री सव्वा दहा वाजता संपला. संयोजकांनी केलेले चोख, सुंदर नियोजन, त्याला गावकऱ्यांनी दिलेला उत्स्फूर्त प्रतिसादामुळे आखाडा सुरेख झाला. मल्लांनी व कुस्ती शौकीनांनीही आखाड्याच्या चांगल्या नियोजनाबद्दल संयोजकांचे कौतुक केले.समालोचक म्हणून प्रशांत भागवत यांनी काम पाहिले.

## काल्याच्या कीर्तनाने हरिनाम सप्ताहाची भक्तिमय सांगता

कोरेगावमुळ (दै. संध्या)

हनुमान जयंती निमित्त कोरेगावमुळ येथे गेल्या सात दिवसांपासून सुरू असलेल्या ज्ञानेश्वरी गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचा समारोप काल्याच्या कीर्तनाने भक्तीरसात न्हाऊन निघाला. या सोहळ्याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. ह.भ.प. तुषार महाराज पाबळे यांनी आपल्या कीर्तनातून भगवान श्रीकृष्ण आणि सुदाम्याच्या मैत्रीचे तसेच गोकुळातील काल्याच्या उत्सवाचे सुंदर वर्णन केले. 'काला म्हणजेच पूर्णत्व' असे सांगत त्यांनी मानवी जीवनात भक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. कीर्तनानंतर दहीहंडी फोडून 'गोविंदा आला रे' च्या गजरात काल्याचा प्रसाद वाटप करण्यात आला.



सप्ताहादरम्यान दररोज पहाटे काकड आरती, दिवसभर ज्ञानेश्वरी पारायण, सायंकाळी हरिपाठ, प्रवचन, कीर्तन आणि महाप्रसाद असा नियमित कार्यक्रम पार पडला. विविध मान्यवर कीर्तनकारांनी समाजप्रबोधन करत हरिनामाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. स्थानिक भजनी मंडळांनी संगीत साथसंगत, गायन व इतर सेवांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

या धार्मिक सोहळ्यास आप्पा कड, शरद शितोळे, मानसिंग कड, कचरू कड, प्रविण शितोळे, दशरथ गायकवाड, सोपान शितोळे, भानुदास जेधे, नितीन कड, अशोक कारंडे, आप्पा देवकाते, मुकिंदा काकडे, ठकशेन कड, लोकेश कानकाटे, काळुराम गायकवाड, राजू भंडारे, बाबा गायकवाड, आबासो काकडे, सुभाष काकडे, दिंगबर कड, दिलीप यादव, सुरेश वाळेकर, संभाजी बोधे, विलास वाघ, संतोष डिंबळे, शेखर कड, अजिंक्य कड, सुरज बोधे, उत्तम कड, निशांत कड, कैलास कड, मच्छिंद्र कड, स्वाती राजगुरु, विजय मोरे, शुभम कोलते, जीवन भोसले, दत्तात्रय थोरात, विशाल बोधे, शुभम बोधे यांसह महिला ग्रामस्थ व बालगोपाल मोठ्या संख्येने उपस्थित होते.


संपूर्ण सप्ताह भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

## अवकाळी पावसामुळे हातात आलेली पीके गेली

माळेगाव (दै. संध्या)

बारामती तालुक्यातील पणदरे, धुमाळवाडी, पवईमाळ परिसरावर अवकाळी पाऊस आणि भीषण गारपीटीने अक्षरशः कहर केला असून, शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. उभ्या पिकांची राखरांगोळी करत या नैसर्गिक संकटाने अनेक कुटुंबांच्या वर्षभराच्या कष्टांवर पाणी फेरले आहे. या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बाधित शिवाराला भेट देत शेतकऱ्यांच्या वेदना जाणून घेतल्या. पणदरे परिसरातील बांधावर जाऊन त्यांनी शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. नुकसानाच्या तुलनेत शासनाकडून मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे आश्वासन त्यांनी दिले.

यावेळी गणेश मुळीक, रोहन जगताप, कुलभूषण कोकरे यांसारख्या शेतकऱ्यांनी आपल्या नुकसानीची व्यथा मांडली. या शेतकऱ्यांचे प्रत्येकी ५० लाखांहून अधिक नुकसान झाल्याचे सांगण्यात आले. काही मिनिटांतच निसर्गाच्या तडाख्याने उभ्या पिकांचा चुराडा झाल्याचे त्यांनी सांगितले. शासनाच्या कृषी विभागाने वेळीच पिकांची विमे उतरवले असते तर नुकसान भरपाई आम्हाला आता मिळाली असती, या समस्येकडे कुलभूषण कोकरे यांनी उपस्थितांचे त्यांनी लक्ष वेधले. माळेगावचे संचालक योगेश जगताप म्हणाले, "सुनेत्रावहिनीसाहेब... काही क्षणांतच हिरवागार शिवार ओसाड झाला. केळी, आंबा, ऊस, चारा पिके आणि पालेभाज्या हातातोंडाशी आलेली सर्व पिके जमिनदोस्त झाली. गारांच्या माऱ्याने झाडांची पाने गळून पडली, फळबागाही उद्ध्वस्त झाल्या आहेत."



## कांद्याच्या आवकेत मोठी घट ; दर स्थिरच

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांद्याच्या आवकेत मोठी घसरण झाली. तब्बल ४ हजार ५०० क्विंटलने कांद्याची आवक घटूनही दरात वाढ झाली नाही. कांद्याची आवक घटूनही भाव स्थिरच राहिले. अखाती देशात युद्धाची स्थिती असल्याने कांद्याची निर्यात ठप्प असल्याने कांद्याचे दर यंदाच्या कांदा हंगामात अजूनही स्थिरच आहेत. कांदा उत्पादकांना अपेक्षित कांद्याची भाव वाढ अद्याप झालेली नाही. त्यातच व्यावसायिक गॅस पुरवठा बंद असल्याने हॉटेल बंद आणि कामगार परतल्याने तरकारी मालाला देखील अपेक्षित उठाव नसल्याचे शेतकरी आणि व्यापाऱ्यांनी सांगितले. चाकण बाजारात पालेभाज्यांची आवक वाढून दरात घसरण झाली. एकूण उलाढाल ५ कोटी ८५ लाख रुपये झाली. चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक ५ हजार क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक ५ हजार ५०० क्विंटलने घटली; मात्र भाव १३०० रुपये प्रती क्विंटलवरच स्थिर राहिले. बटाट्याची एकूण आवक १२५० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक किंचित वाढली. बटाट्याचा कमाल भाव १३०० रुपयांवरून १२०० रुपयांवर स्थिरावला. लसणाची एकूण आवक ४० क्विंटल झाली. गेल्या आठवड्याच्या तुलनेत ही आवक घटून कामालभाव १२ हजार रुपयांवरून १० हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३६५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ५,५०० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे - कांदा - एकूण आवक - ५००० क्विंटल.भाव क्रमांक - १.१,३०० रुपये, भाव क्रमांक

■ एकूण उलाढाल ५ कोटी ८५ लाख रुपये

२. १,००० रुपये, भाव क्रमांक ३. ८००. बटाटा - एकूण आवक - १,२५० क्विंटल.भाव क्रमांक १ .१,२०० रुपये, भाव क्रमांक २. ८०० रुपये, भाव क्रमांक ३. ७०० रुपये.

फळभाज्या - फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३१८ क्विंटल ( ८०० ते १,२०० रू.), कोबी -२४० क्विंटल (५०० ते ७०० रू.), फ्लॉवर -१८८ क्विंटल (८०० ते १,४०० रु.), वांगी -९० क्विंटल (१,००० ते १५०० रु.), भेंडी - ८४ क्विंटल (२,५०० ते ४,००० रु.), दोडका - ५७ क्विंटल (२,५०० ते ३,५०० रु.), कारली - ६७ क्विंटल ( २,००० ते ३,००० रु.), दुधीभोपळा - ६२ क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), काकडी - ९३ ( क्विंटल (१,००० ते १,६०० रु.), फरशी - २० क्विंटल (३,००० ते ४,००० रु.), वालवड - ४२ क्विंटल (३,००० ते ४,००० रुपये), ढोबळी मिरची - १४८ क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), चवळी - ४२ क्विंटल (१,५०० ते २,५०० रु.), वाटाणा - ६० क्विंटल ( ५००० ते ६००० रू. ), शेवगा - ३५ क्विंटल (२,१७० ते २,५०० रु.), गाजर - ५७ क्विंटल (१,००० ते २,००० रु.), गवार - ४८ क्विंटल (५,००० ते ७,००० रु. ), आले - १६० क्विंटल ( ३,००० ते ४,००० रु. )

पालेभाज्या - चाकण येथील बाजारात पालेभाज्यांची एकूण आवक जुड्यांमध्ये व प्रतिशेकडा जुड्यांना मिळालेले भाव पुढीलप्रमाणे - मेथी - एकूण १४ हजार १७५ जुड्या (६०० ते १००० रुपये ), कोथिंबीर - एकूण २७ हजार ५९० जुड्या (४०० ते ७०० रुपये,), शेपू - एकूण २ हजार ५४५ जुड्या (८०० ते १००० रुपये ), पालक - एकूण ३ हजार जुड्या (४०० ते ६०० रुपये)

जनावरे - चाकण येथील जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी आलेल्या ४० जर्सी गाईंपैकी ३० गाईंची विक्री झाली. ( १५,००० ते ७०,००० रु. ), ६० बैलांपैकी ४० बैलांची विक्री झाली. ( १०,००० ते ४०,००० रु. ), ८५ म्हशींपैकी ६५ म्हशींची विक्री झाली. ( ३०,००० ते ८०,००० रु. ), ८,५०० शेळ्या - मेंढ्यापैकी ७,१०० शेळ्यांची विक्री झाली असून त्यांना २,००० रुपयांपासून ते १५,००० रुपयांपर्यंत भाव मिळाला.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कल्याण ठाणगेवाडी हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

कल्याण (दैनिक संध्या) : स्वर्गीय नामदेव खंडू सावंत या भाविक भक्ताने कल्याण पठाणगेवाडी येथे स्थापन केलेल्या हनुमान मंदिरात सर्वत्र भक्ती श्रद्धा आणि उत्साहाचे मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.आकर्षक मंडप रुद्राभिषेक आरती नामस्मरण, भजन, किर्तन आणि महाप्रसाद अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते.भाविकांना अध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेवून हनुमंताच्या नामस्मरणात न्हावून निघाला होता. हनुमान जयंतीचा हा उत्सव नसून श्रद्धा सेवा सामुहीक एकात्मतेचे प्रतिक या पावन दिवशी हनुमंताच्या चरणी नतमस्तक होवून बल बुद्धी विद्या आणि संकटापासून मुक्तीची प्रार्थना केली. श्री हनुमान मूर्तिचे कल्याण शहरातील अनेक मान्यवर सामाजिक राजकिय क्षेत्रातील नवनिर्वाचित नगरसेवक विशाल गारवे,संकेत भोईर, उमेश बोरगांवकर यांनी दर्शन घेतले या समयी महावस्त्र श्रीफळ देवून स्वागत करण्यांत आले. सुनिल सावंत यांच्या नेतृत्वाने या उत्सवाचे नियोजन करण्यात आले होते.दिपक शेंडे,विलास गजरमल, बाबूशेठ हेगडे, सुनिल नायर,किरण पाटील, मदन परदेशी, संभाजी घारे,प्रकाश महाजन,भगवान शर्मा ,सुदाम गाडेकर वृत्तपत्र लेखक,राजेश गुप्ता,आशिष मंडलिक,आनंद वरक,स्वाती शेंडे,सुमन परटोले पवन भारद्वाज यांनी आकर्षक फुलांची सजावट करुन वातावरण सुशोभित केले.या सर्व कार्यकर्ते यांनी विशेष परिश्रम घेवून कार्यक्रम यशस्वी पार पाडला.




### रोटरी क्लब पिंपरीकडून न्यू इंग्लिश स्कुलला शैक्षणिक साहित्य

चिंचवड (दैनिक संध्या) : रोटरी क्लब ऑफ पिंपरीच्या वतीने हॅप्पी स्कुल अंतर्गत चिंचवड गावातील न्यू इंग्लिश स्कूल व आबासाहेब चिंचवडे महाविद्यालयास सौर ऊर्जा प्रकल्पासह शैक्षणिक साहित्य भेट देवून मदतीचा हात दिला . तसेच क्लबच्या वतीने प्रयोग शाळेस १० संगणक संच, रसायनशास्त्र प्रयोग शाळेचे साहित्य, ५ किलो व्हॅट क्षमातेच्या सौर ऊर्जा पॅनेल, क्रिडा साहित्य,बेंच भेट देण्यात आले, तसेच इमारतीची रंग रंगोटी करून दिली. यावेळी क्लबचे माजी अध्यक्ष विमलकुमार बोस, क्लबचे अध्यक्ष आनंद संपत,सचिव रोहन रोकडे,सेवा संचालक सिद्धार्थ बोस,चिंचवड शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुनील चिंचवडे, क्लबच्या माजी अध्यक्षा डॉ विभा झुतशी ,बलबीर चावला, नियोजित अध्यक्ष बाबा भापकर, संतोष गिरंजे,रोट्रॅक्स क्लबचे अध्यक्ष वंश चावला,स्वस्ती राय ,चंद्रशेखर महंत, शाळेच्या कार्यवाह प्रज्ञा जोशी, सदस्या विजया विभांडिक,प्राचार्या माधवी कुलकर्णी, योगिता बनकर आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन जया कट्टे यांनी तर आभार बाबा भापकर यांनी मानले.

### उड्डाणपुलाचा भाग 8-10 महिन्यांतच खचला; तातडीने दुरुस्तीच्या कामाला सुरुवात

उरण (दैनिक संध्या) : उरण : जेएनपीएच्या बीएमसीटी या चौथ्या बंदराशी जोडणारा ६८ कोटी रुपये खर्च करून ८-१० महिन्यांपूर्वी वाहतूकीसाठी खुला करण्यात आलेला उड्डाणपूल अचानक खचल्याने खळबळ माजली आहे.कंटेनर वाहतूकीसाठी धोकादायक ठरत असल्याने बंद करण्यात आला आहे. जेएनपीए अंतर्गत सिंगापूर पोर्ट (भारत मुंबई कंटेनर टर्मिनल ) हे खासगीकरणाच्या माध्यमातून सर्वात मोठ्या लांबीचे चौथे बंदर उभारण्यात आले आहे. सुमारे १३ हजार कोटींहून अधिक खर्चाच्या हे बंदर कार्यान्वितही झाले आहे.या बंदरातुन वर्षाकाठी ५० लाख कंटेनर मालाची वाहतूक केली जाणार आहे.चौथ्या बंदराशी जोडणाऱ्या या ६८ कोटी खर्चाच्या व ७०० मीटर लांबीच्या दुपदरी उड्डाणपूल उभारण्याचे काम जेएनपीएने एनएचएआय कंपनीकडे सोपविण्यात आले होते.हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुलाही करण्यात आला होता.मात्र जसखार रत्नेश्वरी मंदिराच्या बाजुनेच जाणारा उड्डाणपूलाचा काही भाग तडा जाऊन खचला आहे. ८-१० महिन्यांपूर्वीच खुला करण्यात आलेला उड्डाणपूलाचा भाग खचल्याने कामाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

# विक्रोळीतील रत्नबोधी विहारात परिवर्तनाची नांदी

**नवी दमदार कार्यकारिणी जाहीर**




**मुंबई (दै. संध्या)**

विक्रोळी (पूर्व) कन्नमवार नगर येथील बौद्धजन सेवा संघाच्या रत्नबोधी विहाराची कार्यकारिणी निवडणूक नुकतीच पार पडली. या निवडणुकीत नव्या नेतृत्वाची निवड करण्यात आली असून, १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या कालावधीसाठी ही कार्यकारिणी कार्यरत राहणार आहे. नव्या पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे विहाराच्या कामकाजात अधिक गतिमानता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. निवडणुकीत विविध क्षेत्रातील अनुभवी, सामाजिक जाण असलेले व संघटन कौशल्य असलेले कार्यकर्ते निवडून आले आहेत. अध्यक्षपदी प्रवीण भागवत केदारे यांची निवड झाली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली विहाराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. उपाध्यक्षपदी दिपक शंकर पगारे, तर उपाध्यक्षा म्हणून निर्मला गंगाधर गवळी यांची निवड करण्यात आली आहे. सरचिटणीसपदी जगदीश मधुकर गवारे यांच्यावर प्रशासनिक जबाबदारी सोपवण्यात आली असून, चिटणीस म्हणून आनंद शंकर घोक्षे आणि सुवर्णा रघुनाथ टिळक हे कार्य पाहणार आहेत.

आर्थिक नियोजन आणि पारदर्शक कारभारासाठी खजिनदार म्हणून भूपेंद्र प्रकाश हिरे यांची निवड करण्यात आली आहे, तर उपखजिनदार म्हणून राजेश राणोजी साळवे यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. सदस्य म्हणून अरविंद हरिभाऊ जाधव, वैभव माधवराव झेंडे आणि विशाल सोपान कांबळे यांचा कार्यकारिणीत समावेश असून, ते विविध उपक्रमांच्या अंमलबजावणीत सक्रिय भूमिका बजावणार आहेत. नव्या कार्यकारिणीकडून सामाजिक, शैक्षणिक आणि धार्मिक उपक्रमांना अधिक गती देण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार, युवकांना मार्गदर्शन, महिला सक्षमीकरण, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रम, वाचनालय उभारणी, तसेच संविधान व सामाजिक जागरूकतेसाठी विविध कार्यक्रम राबविण्यावर भर दिला जाणार आहे. परिसरातील नागरिकांना एकत्रित आणून समाजहिताचे उपक्रम राबविणे, हेही या कार्यकारिणीचे प्रमुख उद्दिष्ट राहणार आहे.

रत्नबोधी विहार हे विक्रोळी परिसरातील बौद्ध समाजाचे एक महत्त्वाचे आध्यात्मिक आणि सामाजिक केंद्र मानले जाते. येथे नियमित धार्मिक कार्यक्रम, प्रवचन, तसेच सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून या उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, शिंदे सेना ईशान्य मुंबई अनुसूचित जाती-जमाती जिल्हा प्रमुख राजेश पडांगळे यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देत पुढील कार्यकाळासाठी यशस्वी वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. स्थानिक नागरिक आणि कार्यकर्त्यांमध्ये नव्या नेतृत्वाकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त होत आहेत.

## पंच परीक्षेसाठी सुभाष पाटील यांची परीक्षक म्हणून नियुक्ती

**उरण (दै. संध्या)**

तायक्वॉन्डो फेडरेशन ऑफ इंडिया व तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ उत्तराखंड या अधिकृत संघटने मार्फत देहरादून येथे १०ते १२ एप्रिल २०२६ राष्ट्रीय पंच सेमिनार व राष्ट्रीय पंच परीक्षा होणार आहे या होणा-या तायक्वांदो परीक्षा साठी परीक्षक म्हणुन रायगड चे सुपूत्र तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे. सुभाष पाटील हे ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धामध्ये पंच म्हणुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्यांनी अनेक देशात जाऊन सेनिनार केले आहेत नविन नियम २०२६ चे सुभाष पाटील यांनी ईस्वास्तिनी



साऊथ अफ्रीका नियमावली शिक्षण घेऊन भारतात त्याचा प्रसार व प्रचार करण्यासाठी अनेक राज्या मध्ये जाऊन ते सेमिनार घेत आहेत ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत. गोवा नॅशनल गेम २०२३ व नॅशनल गेम उत्तराखंड २०२५ स्पर्धेसाठी सुभाष पाटील यांची पंच प्रमुख म्हणून निवड करण्यात आली होती ते ९ एप्रिल २०२६ रोजी देहरादून उत्तराखंड येथे रवाना होणार आहेत.

## श्री क्षेत्र लेण्याद्री येथे संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रींचे दर्शनाकरीता भाविकांची गर्दी

**जुन्नर (दै. संध्या)**

रविवार दि.०५ एप्रिल २०२६ रोजी संकष्टी चतुर्थीनिमित्त अष्टविनायक तिर्थक्षेत्र श्री क्षेत्र लेण्याद्री (ता. जुन्नर) येथील ‘श्री गिरीजात्मज’ गणपतीचे हजारो भाविकांनी दर्शन घेतले. संकष्टी चतुर्थी व रविवारचे सुट्टीमुळे दिवसभर भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. श्री क्षेत्र लेण्याद्री परिसरास यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. यानिमित्ताने श्री गिरिजात्मजाच्या मूर्तीस व मंदिरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. श्री लेण्याद्री गणपती देवस्थानचे वतीने पहाटे ०६.१५ वाजता देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व विश्वस्त सदाशिव ताम्हाणे यांच्या हस्ते श्रींचा अभिषेक व महापुजा करण्यात आली. त्यानंतर भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. संकष्टी चतुर्थीनिमित्त



‘श्री गिरिजात्मज’ गणेशाच्या मूर्तीस व मंदिर परिसरात फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. देवाचे नैवेद्याकरीता जुन्नर येथील स्मिता प्रकाशसिंह हजारी व विक्रमसिंह प्रकाशसिंह हजारी यांनी २ कॅरेट केळी प्रसाद दिला. मंदिरात सकाळी ७ वाजता, दुपारी १२ वाजता व सायंकाळी ७ वाजता महाआरती करण्यात आली. संकष्टी चतुर्थीनिमीत्त देवस्थानचे वतीने दिवसभर विविध धार्मिकविधी करण्यात आले. भाविकांना देवस्थान ट्रस्ट मार्फत विविध सोयी सुविधा पुरविण्यात आल्या. संकष्टी चतुर्थी व रविवारचे सुट्टीमुळे दिवसभर भाविकांची व पर्यटकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. भाविकांचे दर्शन सुलभ व्हावे याकरीता गर्दीचे नियोजन देवस्थान ट्रस्टच्यावतीने करण्यात आले होते. यावेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे, उपाध्यक्ष गोविंद मेहेर, सेक्रेटरी शंकर ताम्हाणे, खजिनदार भगवान हांडे, विश्वस्त प्रभाकर जाधव, मच्छिंद्र शेटे, सदाशिव ताम्हाणे, काशिनाथ लोखंडे, जयवंत डोके, जितेंद्र बिडवई, कार्यालयीन सचिव रोहीदास बिडवई, व्यवस्थापक निलेश सरजिने, कर्मचारी व ग्रामस्थ तसेच भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी श्री मुक्ताई प्रासादिक भजनी मंडळ, शिवेचीवाडी यांचे संगीत भजन झाले. रात्री चंद्रोदयाच्या वेळी श्रींची महाआरती करण्यात आली. त्यानंतर नवी मुंबई येथील कै.अनुसया विठ्ठल लोखंडे यांचे स्मरणार्थ सुमन गोपीनाथ लोखंडे व प्रियंका विशाल लोखंडे यांच्यावतीने भाविकांकरीता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच अन्नदानाकरीता देवस्थानचे उपाध्यक्ष गोविंद यशवंत मेहेर यांनी रक्कम रु.५००१/- ची देणगी दिली. संकष्टी चतुर्थीनिमित्त दिवसभरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्रीं च्या दर्शनाचा लाभ घेतला. तसेच पुणे, अहमदनगर, मुंबई, ठाणे, नाशिक व जुन्नर परिसरातुन मोठ्या प्रमाणात भाविक श्रींच्या दर्शनासाठी आले होते. अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष ॲड.संजय ढेकणे व सेक्रेटरी शंकर ताम्हाणे यांनी दिली.

## महामुंबई शिक्षण संस्थेच्यावतीने शैक्षणिक समस्यांबाबत सखोल चर्चा

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई व ठाणे (MMR क्षेत्र) महानगर आणि राज्यातील विविध शैक्षणिक समस्यांवर सखोल चर्चा करण्यासाठी महामुंबई शिक्षण संस्था संघटनेच्या विद्यमाने चिल्ड्रन्स वेल्फेअर सेंटर, अंधेरी येथे महत्त्वपूर्ण सहविचार सभा आयोजित करण्यात आली. या सभेला मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अमित साटम प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

सभेच्या अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष सदानंद रावराणे होते व स्वागताध्यक्ष म्हणून अजय कौल होते. प्रारंभी महामुंबई शिक्षण संस्था संघटनेचे कार्यवाह डॉ. विनय राऊत यांनी प्रास्ताविक करताना, मुंबई, राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरील सुमारे १० संघटनांचे ९० पदाधिकारी उपस्थित असून या




संघटनांद्वारे ८५०० शैक्षणिक संस्था व २ लाखांहून अधिक शिक्षकांचे प्रतिनिधित्व होत असल्याची माहिती दिली. सभेमध्ये आरटीई अंतर्गत शिक्षण शुल्क परतावा, अनुदानित शाळांमधील शिक्षक भरती प्रक्रिया, वेतनेतर अनुदान, वीज दर, शाळांची नियमावली, तसेच शाळांच्या आर्थिक अडचणी यांसारख्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. आरटीई अंतर्गत सुमारे ३२०० कोटी रुपयांची थकबाकी असून त्याच्या तुलनेत अत्यल्प निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे निदर्शनास आणून दिले. याशिवाय पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरती प्रक्रिये मधील अडचणी, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी बस भाडे सवलत पुन्हा सुरू करण्याची मागणी, तसेच म्हाडा प्राधिकरणाकडून वाढवण्यात आलेल्या भाडेपट्टीमुळे शाळांवर येणारा आर्थिक ताण यांसारखे महत्त्वाचे प्रश्न उपस्थित करण्यात आले.

या सर्व समस्यांवर आमदार अमित साटम यांनी सकारात्मक भूमिका घेत, ही बैठक पूर्णतः विद्यार्थी-केंद्रित असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी संबंधित मुद्द्यांवर वस्तुस्थितीदर्शक माहितीचा संक्षिप्त अहवाल (Fact Sheet) तयार करून १५ दिवसांत प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

तसेच पुढील एका महिन्यात महानगरपालिका व राज्य शासन स्तरावर चर्चा घडवून आणण्याचे आश्वासन दिले. सभेच्या अध्यक्षीय भाषणात सदानंद रावराणे यांनी सर्व संघटनांनी एकत्रितपणे काम करून वेळेत ठोस प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन केले.

## पुण्यात १७ वर्षीय तरुणीनं उचललं टोकाचं पाऊल

**पुणे (दै. संध्या)**

■ २१ वर्षीय तरुणानं फोटो व्हायरल करण्याची दिली होती धमकी!

तरुणाच्या त्रासामुळे एका अल्पवयीन युवतीने इमारतीच्या छतावरून उडी मारून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बाणेर भागात घडली. शनिवारी (ता. ४ ) सकाळी साडेअकराच्या सुमारास युवतीने इमारतीतून उडी मारली. आरोपी तरुणाने युवतीची छायाचित्रे समाजमाध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिली होती. अल्पवयीन युवती (वय १७, रा. बालेवाडी) हीने आत्महत्या केली आहे. तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या आरोपावरून गोरख सुग्रीव गोरे (वय २१, सध्या रा. एफ रेसीडन्सीजवळ, बालेवाडी, मूळ रा. शंकरनगर, पाटोदा, जि. जालना) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तरुणीच्या भावाने बाणेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेजारी राहणाऱ्या एका तरुणाशी युवती बोलत असल्याने आरोपी तिला त्रास देत होता. आरोपी तरुणाने तिची छायाचित्रे समाजमाध्यमात प्रसारित करण्याची धमकी दिली होती. गुन्हे शाखेच्या पोलिस निरीक्षक अलका सरग या गुन्ह्याचा तपास करत आहेत.

# सध्याचा काळ मानवी मूल्यांची कसोटी पाहणारा : डॉ. श्रीपाल सबनीस

**एकदिवसीय विश्वशांती परिषदेचे पुण्यात आयोजन**

**पुणे (दै. संध्या)**

"जागतिक स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती ही केवळ सीमारेषांपुरती मर्यादित नसून, ती मानवतेच्या मुळावर आघात करणारी आहे. हा केवळ राजकीय, सामाजिक संघर्षाचाच नाही, तर मानवी मूल्यांची कसोटी पाहणारा काळ आहे," असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक व माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले.

भगवान महावीर एज्युकेशन सोसायटी व सहकारी संस्थांच्या वतीने आयोजित विश्वशांती परिषदेत डॉ. श्रीपाल सबनीस बोलत होते. टिळक रस्त्यावरील महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पटवर्धन सभागृहात आयोजित विश्वशांती परिषदेचे उद्घाटन सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांच्या हस्ते झाले. प्रसंगी भगवान महावीर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, झेन मास्टर भन्ते सुदर्शन, फादर अँटोन डिसोझा, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या कार्यवाह अंजली कुलकर्णी, मुलनिवासी मुस्लिम मंचाचे अध्यक्ष अंजुम इनामदार, विचारवंत सरदार पदमसिंग, प्रीतम प्रकाश महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सदाशिव कांबळे, माता रमाई प्रतिष्ठानचे विठ्ठल गायकवाड, ज्ञान फाउंडेशनचे मनोहर कोलते, सुसंगत फाउंडेशनचे डॉ. सुधाकर न्हाळदे, अभय छाजेड, राजेंद्र धोका, शैलेश पगारिया, राजेंद्र सुराणा, श्रीपाल ललवानी व प्रितम प्रकाश महाविद्यालयामधील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले, "युद्धाची सर्वाधिक झळ निरपराध नागरिकांनाच बसते. महिला, बालक आणि दुर्बल घटक यांचे दुःख कोणत्याही विजयापेक्षा मोठे असते. धर्म कधीही हिंसेचे समर्थन करत नाही; युद्ध हे मानवी लोभ




आणि सत्ताकांक्षेचे प्रतीक आहे. आजच्या राजकारणात डोनाल्ड ट्रम्प यांसारख्या ध्रुवीकरण करणाऱ्या नेतृत्वामुळे संघर्ष तीव्र होत आहेत. दोन बलाढ्य राष्ट्रांतील संघर्षाचे परिणाम अखेरीस संपूर्ण मानवजातीला भोगावे लागतात. विज्ञान-प्रगती असूनही मानव सुरक्षित नसेल, तर त्या प्रगतीचा अर्थ काय? संवाद, सहिष्णुता आणि परस्पर आदर यांच्याद्वारेच विश्वशांती शक्य आहे."

संजय नहार म्हणाले, "स्वामी विवेकानंद यांनी १८९३ मधील जागतिक धर्म परिषदेत ‘सर्वधर्म समभाव’ व ‘विश्वबंधुत्वा’चा संदेश दिला होता. आजच्या अस्थिर आणि संघर्षमय जागतिक परिस्थितीत त्या विचारांची गरज अधिक तीव्रतेने जाणवत आहे. ‘विश्वशांती परिषद’ हा त्या परंपरेचा पुढचा टप्पा असून, भारताने ‘वसुधैव कुटुंबकम्’च्या भूमिकेतून जागतिक शांततेसाठी पुढाकार घ्यावा. हा प्रयत्न छोटा असला तरी, तो जगाला शांततेचा, सहअस्तित्वाचा आणि मानवतेचा संदेश देणारा आहे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हे शक्य असून, विश्वशांती ही सामूहिक कृतीतून साकार होणारी जबाबदारी आहे."

डॉ. अशोककुमार पगारिया म्हणाले, "महायुद्धाचा परिणाम केवळ लढणाऱ्या देशांपुरता मर्यादित राहत नाही, तर त्याची झळ संपूर्ण जगाला बसते. आज पेट्रोलच्या रांगा, गॅसची टंचाई यांसारख्या दैनंदिन अडचणींतून हे वास्तव जाणवते. आपला देश थेट युद्धात नसला तरी इंधन व संसाधनांसाठी परावलंबित्वामुळे जागतिक संघर्षांचे आर्थिक व सामाजिक परिणाम आपल्यावरही होतात. त्याचा परिणाम सामान्य माणसाच्या जीवनावर आणि मानसिक शांततेवर होतो. या पार्श्वभूमीवर, डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या संकल्पनेतून आयोजित ‘विश्वशांती परिषद’ हा सकारात्मक आणि आवश्यक उपक्रम ठरतो."

फादर अँटोन डिसोझा म्हणाले, "देव हा प्रकाश, आशा आणि शांततेचा स्रोत आहे. विवेकी, प्रामाणिक आणि जबाबदार नात्यांमधूनच ही शांतता प्रस्थापित होते. युद्धापेक्षा शिस्त, विचार आणि धैर्य अधिक आवश्यक असते. आज विज्ञान प्रगती करत आहे, परंतु ते प्रेम निर्माण करू शकत नाही. हिंसेचा गौरव इतका वाढला आहे की आपण तिच्या परिणामांबद्दल असंवेदनशील होत चाललो आहोत. तरीही, आपण विसरू नये की या जगात अजूनही आशेचे तेजस्वी दीप आहेत."

झेन मास्टर भन्ते सुदर्शन म्हणाले, "संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर उभे असल्याचे आज चित्र आहे. वैज्ञानिक प्रगतीच्या दृष्टीने जग खूप पुढे गेले असले, तरी विचारांच्या पातळीवर मोठे विभाजन दिसून येत आहे. एकीकडे सर्व देश युद्धासाठी सज्ज होत आहेत, तर दुसरीकडे त्याच देशांतील सामान्य नागरिक शांततेचीच अपेक्षा करत आहेत. त्यासाठी सर्वधर्मियांनी एकत्रित प्रयत्न करावेत."

अंजली कुलकर्णी म्हणाल्या, "ही विश्वशांती परिषद अत्यंत योग्य आणि महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. विविध धर्मातील लोकांना एकत्र आणून समाजात शांततेचा आणि एकतेचा संदेश देण्याचा जो निर्धार या परिषदेतून केला जात आहे, तो खरोखरच कौतुकास्पद आहे. हिंदू-मुस्लिमांच्या नावाखाली संघर्ष पेटत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी मानवतेच्या आधारावर एकत्र येणे गरजेचे आहे."

अंजुम इनामदार म्हणाले, "मानवतेचा धर्म जपणे हीच आजची खरी गरज आहे. मानवता हाच खरा धर्म आहे. आपण कोणत्याही धर्माचे असलो तरी त्या मानवतेच्या धर्माला पुढे नेणे, जपणे आणि आचरणात आणणे ही आपली जबाबदारी आहे. मानवता, परस्पर आदरभाव आणि शांततेचे महत्त्व आपण समजून घ्यावे. विविध धर्म, पंथ आणि संस्कृती असूनही, मानवतेच्या मार्गानेच विश्वशांती साध्य होऊ शकते, हे ध्यानात घ्यावे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### 251 वर्षितप भीष्म तपस्वींच्या शाही पारणोत्सवानिमित्त भव्य शोभायात्रा

पुणे (दैनिक संध्या) : जैन वर्षितप अर्थात वर्षभराच्या उपवास या महातपाच्या २५१ भीष्म तपस्वी शाही पारणोत्सवानिमित्त गुरुवार पेठ परिसरात भव्य शोभायात्रा उत्साहात काढण्यात आली. जैन साधू प.पू. आ.वि. श्री राजरत्न सुरीश्वरजी महाराज आदी ठाणा यांच्या पावन उपस्थितीत ही शोभायात्रा पार पडली. शोभायात्रेचा समारोप नाकोडा भवन येथे झाला. या शोभायात्रेत जैन बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. धार्मिक घोषणांनी आणि भक्तिमय वातावरणाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. नाकोडा भवन येथे जैन साधूंचे जैन महिलांकडून भव्य स्वागत करण्यात आले. तसेच जैन मुनींच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात पत्रिका लेखन उत्सवही संपन्न झाला. जैन परंपरेनुसार लग्नाची पहिली पत्रिका देवांच्या नावे लिहून अर्पण केली जाते. त्याच भावनेतून २५१ वर्षितप तपस्वींच्या शाही पारणोत्सव कार्यक्रमाची 'जय जिनेंद्र' पत्रिका लेखन विधी लाभार्थी वेलचंदजी लखमाजी रामसीणा परिवार यांच्या हस्ते शुभमंगल वातावरणात करण्यात आला. तसेच वर्षितप शाही पारणोत्सव आणि 'घर घर तोरण' उपक्रमासाठी लीलाचंदजी प्रागाजी निंबाजिया परिवार यांचेही सहकार्य लाभले. या धार्मिक सोहळ्याचे आयोजन श्री गोटीवाला ओसवाल जैन संघ, पुणे आणि नाकोडा भैरव जैन भवन, पुणे यांच्या वतीने करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रम भक्ती, श्रद्धा आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



### महामार्गावर रास्ता रोको आंदोलन


दौंड (दैनिक संध्या) : पाटस (ता. दौंड) येथील आद्य क्रांतीवीर उमाजी नाईक यांच्या फलकावर अज्ञात समाजकंटकांनी दगडफेक करून तोडफोड केल्याच्या घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला आहे. या घटनेच्या निषेधार्थ जय मल्हार क्रांती संघटनेच्या वतीने पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. शनिवारी दिनाक 4 ऐप्रिल रोजी सकाळी ११ वाजता झालेल्या या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला व पुरुष सहभागी झाले होते. आंदोलकांनी महामार्गावर बसून सुमारे अर्धा तास वाहतूक रोखून धरली. त्यामुळे दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी प्रशासनाकडे संबंधित आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली. तसेच पुढील दोन दिवसांत कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला. या आंदोलनात जय मल्हार क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष, पदाधिकारी, विविध सामाजिक संघटनांचे कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. दरम्यान, संबंधित घटनेबाबत पोलिसांकडून तपास सुरू असून लवकरच आरोपींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असे यवत पोलीस निरिकक्ष नारायण देशमुख यानी सांगितले.

### हिंदु राष्ट्र जागृती सभेच्या प्रसारासाठी हडपसर (पुणे) येथे भव्य वाहनफेरी !



हडपसर (पुणे) (दैनिक संध्या) : हडपसर येथे आयोजित हिंदु राष्ट्रजागृती सभेचे रणशिंग फुंकण्यासाठी काढण्यात आलेल्या भव्य वाहनफेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. दुचाकींवरील फडकत असलेले भगवे ध्वज, पारंपरिक वेशभूषेतील स्वाभिमानी हिंदुत्वनिष्ठ आणि 'हिंदू ऐक्य' अन् 'हिंदुत्वाचा' गौरव करणाऱ्या घोषणांनी संपूर्ण वातावरण चैतन्यमय झाले होते. मार्गावर ठिकठिकाणी झालेली पुष्पवृष्टी आणि धर्मप्रेमींचा उत्साह यामुळे संपूर्ण परिसर पूर्णपणे हिंदुत्वमय झाला होता. प्रारंभी जय शंकर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष विप्र शिरोमणी श्री. सु.द. उपाख्य पप्पाजी पुराणिक यांच्या हस्ते धर्मध्वजाचे पूजन करून फेरी प्रारंभ झाली. या वेळी सनातन संस्थेच्या सद्गुरु स्वाती खाडये आणि सनातनच्या संत पू. (सौ.) मनीषा पाठक, यांच्या वंदनीय उपस्थितीसह हिंदु जनजागृती समितीचे महाराष्ट्र आणि छत्तीसगड राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. तीन ठिकाणी वाहन फेरी आणि धर्मध्वजाचे स्वागत झाले. हिंदुत्वनिष्ठ हनुमंत गावडे, पुण्याचे नगरसेवक नितीन गावडे, फुरसुंगी उरळी देवाची येथील नगर परिषदेच्या नगरसेविका सौ. मोनिका निलेश पवार यांनी धर्मध्वजाचे स्वागत केले.एका ठिकाणी फटाके वाजवून वाहन फेरीचे स्वागत करण्यात आले. हडपसर येथील धर्मसभेला संबोधित करणारे वक्त्यांचे कट आउट वाहन फेरीमध्ये सहभागी झालेल्या धर्माभिमान्यांनी हातात घेतले होते. हिंदू राष्ट्र जागृती सभेची माहिती सांगणारी चलचित्रफीत चालू असलेला टेम्पो वाहन फेरीमध्ये सहभागी झाला होता. फेरीचा प्रारंभ येथील भेकराईनगर PMT बस डेपोपासून दुपारी 5.00 ला झाला. पापडेवस्ती, काळेपडळ, ससाणेनगर, पुरोहित स्वीट चौक, काळेपडळ मार्गाने निघालेल्या फेरीचा समारोप कै. मारुतराव काळे विद्यालयाचे मैदान येथे सांगता सभेने झाला. या वेळी 'धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदानाचे स्मरण करूया, हिंदू राष्ट्रासाठी कृतीशील होऊया', 'मनामनात श्रीराम, प्रत्येक श्वासात श्रीराम', 'धर्मशिक्षण हाच खरा धर्मरक्षणाचा उपाय' यांसह अन्य घोषणा देण्यात आल्या. 200 हून अधिक धर्माभिमानी 100 हून अधिक वाहने वाहन फेरीमध्ये सहभागी झाले होते. महिलांची संख्या लक्षणीय होती.

### प्रा. लक्ष्मण हाके बारामती पोटनिवडणुकीत उतरले; सुनेत्रा पवारांना थेट आव्हान



बारामती (दैनिक संध्या) : ओबीसी आंदोलनाचे नेते प्रा. लक्ष्मण हाके यांनी बारामती विधानसभा पोट निवडणूक लढविण्याचा निर्णय रविवारी (ता 5) जाहीर केला. ओबीसी समाजाचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी व या प्रश्नांकडे लक्ष वेधण्याच्या उद्देशाने आपण ही निवडणूक लढवत असल्याचे लक्ष्मण हाके यांनी स्पष्ट केले आहे. सोमवारी ( ता. 6) सकाळी अकरा वाजता लक्ष्मण हाके बारामतीच्या प्रशासकीय भवन येथे जाऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून लक्ष्मण हाके हे बारामती शहर व तालुक्यामध्ये फिरून लोकांशी संवाद साधत होते. आपल्या कार्यकर्त्यांशी बोलून आपण निवडणुकीबाबतची भूमिका ठरवू असे त्यांनी जाहीर केले होते. अखेर रविवारी त्यांनी बारामतीतून निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या विरुद्ध लक्ष्मण हाके रिंगणात उतरणार आहेत.

# उरुळी कांचन सह परिसरात बेकायदेशीर बॅनरचा सुळसुळाट

**नागरिकांच्या जीवाला धोका!**



उरुळी कांचन (दै. संध्या)

हवेली तालुक्यातील पुणे सोलापूर महामार्ग सहित परिसरातील गावामधे अनधिकृत बॅनर व होल्डिंगचा अक्षरशः 'मृत्यू सापळा' उभा राहिला आहे. राजरोसपणे लावलेले प्रचंड बॅनर, होल्डिंग आता थेट नागरिकांच्या जीवावर उठले असून प्रशासन मात्र अद्याप गाढ झोपेत असल्याचा संतापजनक आरोप नागरिकांकडून होत आहे. सध्या अवकाळी पाऊस, सुसाट वारा येत आहे. या सुसाट वाऱ्यामुळे बॅनर व होल्डिंग नागरिकांच्या जीवावर उठले आहेत.

गुरुवार (ता. २) रोजी पुणे–सोलापूर महामार्गावरील तळवाडी चौकात भीषण प्रकार घडला. तब्बल ४० ते ४५ फूट उंचीवरून सुटलेले ४×४ साईजचा बॅनर थेट एका महिलेच्या डोक्यावर आदळला. या घटनेत महिला जखमी झाली; सुदैवाने मोठी जीवितहानी टळली.

> होल्डिंग कोसळल्याची माहिती आम्हाला मिळाली आहे. पडलेल्या होल्डिंगची शहानिशा करून योग्य ती कारवाई केली जाईल, पुणे सोलापूर महामार्गावरील पीएम आर डी हद्दीत येणाऱ्या होल्डिंगची पाहणी करून अनाधिकृत होल्डिंग वर लवकरच कारवाई केली जाईल.
> **- हिम्मत खराडे, अधिकारी पीएमआरडी पुणे.**

शुक्रवार (ता. ३) रोजी सायंकाळी वादळी वाऱ्यासह पावसात उरुळी कांचन येथील जगदंबा फर्निचरच्या गोदामावर तब्बल ५० ते ६० फूट उंचीचे लोखंडी होल्डिंग कोसळले. या दुर्घटनेत दुकानदाराचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याची माहिती मालक म्हस्के यांनी दिली. या वादळी वाऱ्यात परिसरातील अनेक ठिकाणी लाकडी बॅनर व लोखंडी फ्रेम असलेले होल्डिंग कोसळले आहेत. त्यामुळे परिसरात अक्षरशः भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महामार्गाच्या डीव्हायडरवर, वीज खांबांवर, रस्त्याच्या बाजूला, चौकाचौकांत आणि अगदी ओढ्याच्या पुलावरील सुरक्षाजाळीवरही बेकायदेशीर आपल्या जाहिरातीचे बॅनर लावले आहेत. अनेक ठिकाणी व महामार्गाच्या सेवा रस्त्यावर जाळीसकट बॅनर कोसळून रस्त्यावर धोकादायक पडले आहेत. सार्वजनिक ठिकाणी जीव धोक्यात घालणारे हे होल्डिंग तात्काळ हटवून संबंधितांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा एखादी भीषण दुर्घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावरच येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. पुणे सोलापूर महामार्गासह परिसरात होल्डिंग, बॅनरचा महापूर, पण कारवाई शून्य! संपूर्ण परिसरात होल्डिंगचा सुळसुळाट झाला असून प्रशासनाची भूमिका मात्र 'निष्क्रिय'च दिसत आहे.

> आपल्याकडून कोणालाही फ्लेक्स (बॅनर) होल्डिंग लावण्यास परवानगी नाही, उरुळी कांचन परीसरातील लावण्यात आलेले फ्लेक्स (बॅनर) काढण्यात येतील, होल्डिंग बाबत पोलीस स्टेनला पत्रव्यवहार केला जाईल.
> **- श्रीकांत वाव्हळ - उरुळी कांचन, ग्रामविकास अधिकारी**

## डिझेलमध्ये 'बायो-आयसोब्युटेनॉल' मिश्रणाचा पर्याय

पुणे (दै. संध्या)

पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणानंतर आता डिझेलसाठी 'बायो-आयसोब्युटेनॉल'चा पर्याय पुढे येत आहे. साखर कारखान्यांमध्ये बायो-आयसोब्युटेनॉल उत्पादन करणे शक्य होणार आहे. सध्याच्या इथेनॉल उत्पादन प्रकल्पांमध्ये 'बोल्ट-ऑन' मॉड्युल्स बसवून बायो-आयसोब्युटेनॉलचे उत्पादन करता येणार आहे. या तंत्रज्ञानामुळे साखर उद्योगाला मोठी चालना मिळू शकते. आता बायो-आयसोब्युटेनॉलबाबत धोरण निश्चित होण्याची प्रतीक्षा आहे.

युद्धजन्य परिस्थितीमुळे कच्च्या तेलाच्या पुरवठ्यातील अनिश्चितता लक्षात घेता, बायो-आयसोब्युटेनॉलचे डिझेलमध्ये मिश्रण उपयोगी ठरू शकते. याशिवाय केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही बायो आयसोब्युटेनॉलच्या डिझेलमध्ये मिश्रणाबद्दल विविध कार्यक्रमात भाष्य केले आहे. देशातील एकूण इंधन वापरात डिझेलचा सुमारे ४० टक्के वाटा आहे. रेल्वे, राज्य परिवहन महामंडळे, मालवाहतूक करणारे ट्रक तसेच शेतीतील ट्रॅक्टर यासह इतर घटक डिझेलवर अवलंबून आहेत. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण यशस्वी झाले असले, तरी डिझेलसाठी ते तांत्रिकदृष्ट्या शक्य नाही. बायो-आयसोब्युटेनॉल हे पाणी न शोषणारे (हायड्रोफोबिक) असल्याने ते डिझेलमध्ये सहज मिसळते आणि इंजिनवर कोणताही विपरीत परिणाम होत नसल्याचे तज्ज्ञ सांगतात. प्राज इंडस्ट्रीजने तंत्रज्ञान विकसित केले असून, आता व्यावसायिक उत्पादनासाठी तयार आहे. त्यासाठी सरकारच्या धोरणाची प्रतीक्षा आहे. पेट्रोलप्रमाणेच डिझेलमध्ये बायो-आयसोब्युटेनॉल मिश्रणाचे धोरण जाहीर होणे आवश्यक आहे, तसेच उत्पादकांना परवडेल अशी खरेदी किंमत निश्चित केल्यास येत्या तीन ते चार वर्षांत या इंधनाचा वापर सुरू होण्याची शक्यता आहे.

## लोणी काळभोर पोलीसांची अवैध हातभट्टी धंद्यावर कारवाई

**२,९५,०००रुपयांचा माल जप्त**



लोणी काळभोर (दै. संध्या)

लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के व त्यांच्या पथकाने ४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रभावी ग्रस्त घातली गस्तीदरम्यान सकाळी सुमारे ९.१५ वाजण्याच्या सुमारास आलमगीर जामा मशिद कब्रस्तान परिसरात संशयास्पद हालचाल दिसून आली. तपास करत असताना एका पत्र्याच्याशेडमध्ये मुबारक जाफर गड्डे (वय ४८) आणि बानो मुबारक गड्डे (वय ४०) हे दोघे ५०० लिटरच्या सिनटेक्स टाकीत साठवलेली सुमारे ४५० लिटर गावठी हातभट्टी दारू वेगवेगळ्या कॅनमध्ये भरून विक्रीसाठी वाहतूक करताना आढळले. पोलिसांनी तत्काळ छापा टाकत आरोपींना ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून ४५ हजार रुपयांची दारू, १.५० लाख रुपयांची अल्टोकार, ५० हजार रुपयांची टीव्हीएस ज्युपिटर मोपेड आणि ५० हजार रुपयांची होंडा अँक्टिव्हा असा एकूण २.९५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. चौकशीत आरोपींनी ही दारू समीर संजय राठोड (वय २३, रा. शिंदवणे) याच्याकडून घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी शिंदवणे येथे जाऊन राठोड यालाही ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई लोणी काळभोर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत तब्बल २ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईत दोघांना अटक करण्यात आली असून मुख्य पुरवठादारालाही ताब्यात घेण्यात आले आहे. पुणे शहर पोलीस आयुक्त यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलीस उपआयुक्त राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे व पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के, पोलीस हवालदार माने, जगदाळे, दडस, गिरी, सोनवणे, पोळ, या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली. पोलिसांनी स्पष्ट केले आहे की, परिसरातील अवैध धंद्यांविरोधात अशीच कठोर कारवाई पुढेही सुरू राहणार आहे.

## दीडशे वर्षानंतर जेजुरीत जानाई देवीची यात्रा

■ देवीची मिरवणूक, कुस्त्याचा आखाडा, बैलगाड्या शर्यत, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

जेजुरी (दै. संध्या)



महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवीची दीडशे वर्षानंतर पहिल्यांदाच जेजुरीत यात्रा भरत असून दिनांक 10 ते 12 एप्रिल दरम्यान देवीचा धार्मिक विधी, मिरवणूक, छाबिना, कुस्त्यांचा जंगी आखाडा, बैलगाड्यांची शर्यत, सांस्कृतिक कार्यक्रम अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याचे जेजुरी ग्रामदेवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर गोडसे, सचिव छबन कुदळे यांनी सांगितले. तीर्थक्षेत्र जेजुरी नगरीत खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात मात्र दीडशे वर्षे गावातील देवीची यात्रा भरली नसल्याने ही यात्रा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय जानाई मंदिर ट्रस्ट, खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाने घेतला. दिनांक 10 ते 12 एप्रिल दरम्यान ग्रामदेवता जानाई देवीची यात्रा भरत आहे. दिनांक 10 रोजी ग्रामदैवता जानाई देवीची महापूजा, नैवद्य, देवाची रथातून ग्राम प्रदक्षिणा व छबीना या धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक 11 रोजी श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने श्री मार्तंड केसरी कुस्त्यांचा आखाडा होणार असून या आखाड्यात महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध सिकंदर शेख, शिवराज राक्षे विरुद्ध शांटीकुमार, सुशांत तांबूळ विरुद्ध शाहरुख खान, आदी नामवंत मल्लांच्या कुस्त्या होणार असून प्रथम क्रमांकासाठी दोन लाख रुपये, चषक व इतर कुस्त्यांसाठी मोठी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

या कुस्त्यांच्या आखाड्यासाठी राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांतदादा पाटील, दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, खासदार सुप्रिया सुळे, आमदार विजय शिवतारे, माजी आमदार संजय जगताप नगराध्यक्ष जयदीप बारभाई तसेच अनेक महाराष्ट्र केसरी मल्ल उपस्थित राहणार आहेत.

याच दिवशी नृत्यांगना कामिनी पुणेकर यांचा नाद करा पण आमचा कुठ या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक 12 रोजी मार्तंड केसरी बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले असून नामवंत बैलगाडा या शर्यतीत सहभागी होणार आहेत.

याच दिवशी रात्री नृत्यांगना रिया पाटील प्रस्तुत वेड घुंगराचे या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जेजुरी ग्रामदैवता सार्वजनिक जानाई देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर गोडसे, जेजुरी खंडोबा पालखी सोहळा ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे व यात्रा कमिटीचे अध्यक्ष मंगेश घोणे व पदाधिकाऱ्यांनी दिली.

## पुण्यात बास्केटबॉल पोस्ट कोसळून विद्यार्थ्यांचा मृत्यू

पुणे (दै. संध्या)

पुणे जिल्ह्याच्या मावळ तालुक्यातील इंदोरी येथील प्रतिष्ठित तोलानी मेरीटाईम इंस्टीट्युटच्या आवारात बास्केटबॉल पोस्ट अंगावर कोसळून गंभीर जखमी झालेल्या २० वर्षीय विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (ता.०५) सकाळी घडली. विशाल वर्मा (२०,तोलानी मेरीटाईम इन्स्टिट्यूट विदयार्थी वसतिगृह, इंदोरी,ता.मावळ,जि,पुणे/ मुळ गाव आयोध्या,उत्तर प्रदेश) असे मयत विद्यार्थ्यांचे नाव आहे. तळेगाव - चाकण रस्त्यावरील तोलानी इन्स्टीट्युटच्या आवारात बास्केटबॉल ग्राऊंडवर विदयार्थी रविवारी सकाळी साडेसात वाजता बास्केटबॉल खेळत होते. दरम्यान विशाल हा बास्केटबॉल रिंगला लटकला असता, जास्त वजन असल्यामुळे रिंग तुटली. त्या पाठोपाठ लोखंडी पोल देखील खाली पडला. लोखंडी पोल अंगावर पडल्यामुळे त्याचा स्काल्फ फॅक्चर झाल्याने त्याला उपचारांसाठी.

भाऊसाहेब सरदेसाई तळेगाव जनरल हॉस्पिटलच्या अपघात विभागात दाखल केले असता सकाळी दहाच्या सुमारास डॉक्टरांनी त्याला मयत घोषित केले.तळेगाव जनरल हॉस्पिटलच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.सुचिता काळे यांनी तळेगाव एमआयडीसी पोलिसांना खबर दिली. अशी माहिती तळेगाव एमआयडीसी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक प्रशांत रेळेकर यांनी दिली.

# सोसाट्याचा वारा आणि पाऊस यामुळे जेऊरमध्ये केळी पिकाचे मोठे नुकसान

**सभापती अमित झेंडे आणि प्रशासनाकडून नुकसानीची पाहणी**

नीरा (दै. संध्या)



राज्यामध्ये मागील सहा सात दिवसापासून काही ठिकाणी पावसाने जोरदार हजेरी लागली त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात सोसाट्याचा वारा आणि गारपीट यामुळे अनेक ठिकाणी शेती पिकाचं मोठ नुकसान झाले आहे. पुरंदर तालुक्यातील जेऊर येथे देखील या सोसायट्याच्या वाऱ्याचा आणि पावसाचा फटका केळी पिकाला बसला आहे. जेऊर मध्ये असलेले केळीचे पीक जवळपास निम्म्याहून जास्त खराब झाल असून शेतकऱ्याला याचा मोठा तोटा सहन करावा लागत आहे

पुरंदर तालुक्यातील शेतकरी फळ पिकांचा शेतकरी म्हणून ओळखला जातो. जेऊर, मांडकी ही गावे प्रामुख्याने ऊस बागायतदारांचं गाव म्हणून ओळखलं जातं मात्र या भागातील शेतकरी आता ऊस सोडून इतर पिकांना देखील प्राधान्य देऊ लागला आहे. सध्या जेऊर मध्ये वेगवेगळ्या शेतकऱ्यांनी साडेबारा एकर क्षेत्रावर केळीची लागवड केली आहे. मात्र मागील पाच-सहा दिवसातील वादळ वाऱ्याने या भागातील काढणीला आलेल्या केळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या भागातील शेतकरी आता हवालदिल झाला आहे आणि म्हणूनच पुरंदर पंचायत समितीचे नवनिर्वाचित तरुण सभापती अमित झेंडे यांनी आज जेऊर गावाला भेट देऊन नुकसानीची पाहणी केली. त्याचबरोबर ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. त्या शेतकऱ्यांचं दिलासा दिला आहे. यावेळी त्यांच्यासोबत पुरंदर राष्ट्रवादीचे अध्यक्ष उत्तम धुमाळ, माऊली धुमाळ मंडल अधिकारी बापूसाहेब देवकर, ग्रामसेवक सुलोचना कदम, कृषी दिनेश धायगुडे, माजी सरपंच हिराबाई धुमाळ, निखिल शिरसाट,संजय धुमाळ, ऋतिक चोरगे, मनोहर धुमाळ, आदींसह जेऊर आणि परिसरातील अनेक शेतकरी उपस्थित होते. सभापती अमित झेंडे यांनी यावेळी शेतकऱ्यांचे संवाद साधला आणि प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी केली. यावेळी माध्यमांशी बोलताना झेंडे म्हणाले की, पावसामुळे शेतकऱ्यांचं प्रचंड मोठ नुकसान झालेल आहे. ते कधीही भरून निघणार नाही अशा स्वरूपात आहे. मात्र तरी देखील शासनाच्या माध्यमातून जे काही मदत करणे शक्य होईल अशी मदत मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करू. वादळ वाऱ्यामुळे केळीची झाडे उडून पडले आहेत तर काढण्यात आलेली केळीचे गड हे खाली पडल्याने आता ते चढू लागले आहेत त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे जवळपास 60 टक्केहून अधिक पिकाचं नुकसान झाल आहे.

राज्य शासनाच्यावतीने केळी पिकाला फळ पिकाचा दर्जा देण्यात आलेला नाही. त्यामुळे इतर पिकाप्रमाणे या पिकाला देखील हेक्टरी 15000 रुपयाचे अनुदान(नुकसान भरपाई) दिले जाते. मात्र या पिकासाठी शेतकऱ्यांनी वर्षभरात चार लाख रुपये इतका खर्च केला आहे. एक्सपोर्टकॉलिटीच (निर्यातक्षम) उत्पादन शेतकऱ्यांनी घेतलं होतं. त्यामुळे व्यापाऱ्यांनी 20 रुपये प्रति किलो याप्रमाणे मागणी केली होती. मात्र आखाती देशात सुरू असलेले युद्ध आणि आता गारपिटीमुळे झालेलं नुकसान यामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झाले आहे. केळी पिकाला शासनाने फळबागेचा दर्जा द्यावा आणि त्या पद्धतीने विमा सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी आता शेतकऱ्यांनी केली आहे.